## DIVYA AGRO CHEM PRIVATE LIMITED (IN LIQUDIATION)
## NOTICE OF SALE OF ASSETS COLLECTIVELY
## CIN: U24219MH2009PTC192776 THROUGH E-AUCTION

**Regd. Off. At** : 9 Queens Lawn Premises CHS Ltd, Plot No. 967, Opp Sony Mony, S.V. Road, Vile Parle (W), Mumbai - 400056.

**(Sale under the provisions of Insolvency and Bankruptcy Code, 2016)**

Notice is hereby given to the public in general under the provisions of Insolvency and Bankruptcy Code, 2016 and Regulations there under, that the process of sale of Divya Agro Chem Private Limited – In Liquidation (Corporate Debtor/CD) Sale of Assets on Collectively of forming part of Liquidation Estate formed by the Liquidator, appointed by the Hon'ble NCLT, Mumbai vide order dated December 19,2023 (order received on January 2, 2024) read with order dated October 09, 2024 is scheduled to take place on 21st January, 2026.

The E-Auction will be conducted on "**AS IS WHERE IS BASIS, AS IS WHAT IS BASIS, WHATEVER THERE IS BASIS AND NO RECOURSE BASIS.**"

Sale will be done by the undersigned through E-Auction service provider PSB Alliance Private Limited through portal https://baanknet.com. All the assets are located at the Plot no. A-14, Mahad Industrial Area, Village-Kamble, Raigad- 402 309. Asset Id No. 646 and 668 for search of auction property.

| | |
|---|---|
| Date and Time of E-auction | Wednesday 21st January, 2026; From 11:00 A.M. to 2:00 P.M. |
| Last Date and Time for submission of Expression of Interest (EOI) along with supporting documents | Saturday, 17th January, 2026 |
| Date and Time for Inspection (Assets to be auctioned are located at Mahad, Maharashtra) | Monday 22nd December, 2025 to Saturday, 17th January, 2026 (12 noon to 4:00 p.m.) |
| Last date for submission Earnest Money Deposit | Saturday, 17th January, 2026 |

| Sr. No. | Description (Assets) | Reserve Price | EMD (approx. 10% of Reserve Price) | Incremental Bid Amount |
|---|---|---|---|---|
| | | | | Amount in INR |
| Block A | Sale of Factory Land & Building with furniture and fixtures | 78,21,900 | 7,83,000 | 1,00,000 |

**Important Terms and Conditions of E-auction** : 1. Earnest Money Deposit (EMD) of the successful bidder shall be forfeited if found ineligible during the auction process.

2. Bidding will be allowed only if EMD prescribed for the respective lot is remitted as per specified timeline.

3. As on the date of issuance of Sale Certificate by the Liquidator, the current operational assets shall be transferred / deemed to have been transferred subject to terms and condition of E-Auction Process Document.

4. The Registration charges and other applicable taxes/charges if any shall be paid extra by the successful bidder to conclude the sale.

5. Kindly refer to detailed terms and condition to understand the process of bidding thorough 11th E-Auction Process Document.

**Important Note:** a. The details of all the assets along with any pending legal cases/ on-going litigations if any, are to be mandatorily seen before participating in the auction. The prospective bidders are advised to make their own independent inquiries regarding Corporate Debtor. The Interested Applicants may refer to the complete E-Auction Process Document containing details of terms and conditions of the E-Auction on the website of the E-Auction service provider **https://baanknet.com** or may directly write an email to **cirp.dacpl@gmail.com** obtain the same.

b. It is clarified that, this invitation purports to invite prospective bidders and does not create any kind of binding obligation on the part of the Liquidator or the Company to effectuate the sale. The Liquidator has the absolute right to accept or reject any or all offer(s)/bids or adjourn/ postpone/cancel the e-Auction or withdraw any property or portion thereof from the auction proceeding at any stage or disqualify any interested party / potential investor / bidder without any liability. Any revision in the sale notice will be uploaded on the website on **https://ibbi.baanknet.com/eauctionibbi/auc-listing**

c. It is requested to all the bidders to kindly visit the website regularly.

Sd/-

**Ms. Palak Swapnil Desai**
**Liquidator of Divya Agro Chem Private Limited (In Liquidation)**
**IBBI Regn. No.: IBBI/IPA-001/IP-P01517/2019-2020/12515**
AFA No: AA1/12515/02/311225/107595 (valid till 31st December, 2025)
Address: 901, 9th Floor, Park Vistas, Opp. Lallubhai Park, Near MTNL, Andheri (W), Mumbai-400050
Place: Mumbai, Date: 22.12.2025

१०३ शतकोत्तर वाटचाल
R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
नवाकाळ
• मुंबई, सोमवार २२ डिसेंबर, २०२५ • वर्ष-१०३, अंक-२८८, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL
• Vol.- 103, Issue - 288, Marathi - Daily - Mumbai, 22 December, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
कणकवलीत राणेंविरोधात दोन्ही शिवसेना एकत्र आले आणि जिंकले!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# नगरपालिका निवडणुकीत भाजपा, शिंदे, अजित पवारच जोरात

## ठाकरे बंधू मुंबईत बसून राहिले! दणदणीत हरले! शरद पवारांनाही नाकारले

■ मुंबई

**ही निवडणूक** जाहीर झाल्यावर फडणवीस, शिंदे आणि अजित पवार प्रचार करीत गरागरा फिरले. 'कमळ म्हणजे कमळच' ही घोषणा करीत फडणवीसांनी परिश्रमाची पराकाष्ठा केली. हे सर्व सुरू असताना शरद पवार कुठेच गेले नाहीत. त्यांचे दौरे, त्यांच्या सभाच झाल्या नाहीत. सुप्रिया सुळे नेहमीप्रमाणे संसदेतील आपली भाषणे आणि जिंदालच्या मुलीच्या लग्नसमारंभात गुंतल्या होत्या. काँग्रेसचे गावभरातील स्वयंभू नेते आहेत ज्यांनी आपापले गड राखले आणि हाताची लाज थोडीतरी राखली.

ठाकरे बंधूंनी मात्र कमाल केली. नगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराची धामधूम सुरू असताना ठाकरे बंधू मुंबईत एकमेकांच्या घरी भेट देत बसले होते. दोघांनी प्रचारसभा घेतल्या नाहीत की दौरे केले नाहीत. त्यांनी या निवडणुकीकडे लक्षच दिले नाही. मुंबईत बसून दोघे भाऊ हिंदुत्व आणि मराठी माणूस याचा दिंडोरा पिटत राहिले. तिकडे उद्धव ठाकरेंना ९ ठिकाणी आणि मनसेला केवळ एका ठिकाणी गावकऱ्यांनी विजयी केले. मराठी माणसांनीच दोघांचा दणदणीत पराभव केला. उद्धव आणि राज यांचे केवळ मुंबई पालिकेकडे लक्ष आहे. तिथेही युती जाहीर करण्याइतपत त्यांचे एकमत अद्याप झालेले नाही. अख्ख्या महाराष्ट्राकडे पूर्ण दुर्लक्ष करून हे बंधू मराठी भाषा कशी वाचवणार आणि हिंदुत्त्वाचा झेंडा

» पान ७ वर

**आज २८८ नगराध्यक्ष आणि नगरपालिकांचे निकाल जाहीर झाले. यात भाजपाने दणदणीत यश मिळवले. शिंदेसेनेने सत्तेत हातपाय पसरले. कोकणही उबाठाकडून खेचून घेतले. अजित पवारांनी आपले गड राखले. विरोधकांची मात्र अब्रू गेली. काँग्रेसने दोन आकडी विजय मिळवून जरातरी लाज राखली. पण ठाकरे बंधू दणदणीत हारले. गावागावातील मराठी माणसांनीच ठाकरे बंधूंची मशाल विझवली आणि इंजिन थेट यार्डात नेले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचीही केविलवाणी अवस्था झाली. त्यामुळे शरद पवारांनी आता निवृत्त होऊन अजित पवारांकडे पूर्ण पक्ष सोपवावा ही स्थिती प्रकर्षाने पुढे आली.**



(छाया-दीपक साळवी)

**नगराध्यक्ष - २८८**

| | |
|---|---|
| महायुती - | २१२ |
| मविआ - | ५१ |
| स्थानिक आघाडी - | २५ |

### मनसेचा एक नगरसेवक गुहागरमध्ये विजयी

गुहागर येथेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) यश मिळाले असून, मनसेच्या कोमल जांगळी यांनी प्रभाग क्रमांक ४ मधून नगरसेवकपदी विजय मिळवला आहे. संपूर्ण निवडणुकीत मनसेला मिळालेला हा एकमेव विजय आहे. हा निकाल जाहीर होताच विजयाचा जल्लोष करण्यात आला. गुहागर नगरपंचायतीत नगराध्यक्षपद भाजपाने पटकावले आहे तर शिवसेना-भाजपा युतीने एकूण १७ पैकी १३ जागांवर विजय मिळवत नगरपंचायतीवर वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

सिद्ध कॅल्सीयोग®
आयुर्वेदिक कॅल्शियम टॅब्लेटस्
• हाडांचे आणि सांध्यांचे टॉनिक.
• हात, पाय, कंबर, गुडघे, पाठ, सांधे दुखणे यासाठी उत्तम. • केस गळणे कमी होते. • स्नायू, लिगामेंट दुखापतीवर प्रभावी.
Amazon वर कॅश ऑन डिलिव्हरी उपलब्ध
डॉ. अभिजीत 9422011723
धौतीयोग चे प्रभावी उत्पादन

## एपस्टिन फाईल्समध्ये आयुर्वेदिक मसाजचा उल्लेख! अल्पवयीन शोषणाचाही खुलासा

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेतील** अल्पवयीन मुलींच्या गैरवापरातून राजकीय व व्यावसायिक दबावाचे षड्यंत्र याचा खुलासा ज्या एपस्टिन फाईलमधून झाला त्या कागदपत्रांमध्ये एका बाजूला आयुर्वेदिक मालिश आणि पारंपरिक उपचार पद्धतींचा उल्लेख आहे. तर दुसऱ्या बाजूला मसाजच्या नावाखाली अल्पवयीन मुलींच्या शोषणाचे गंभीर आरोप उघड झाले आहेत. या फाईल्समध्ये अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची छायाचित्रे आणि एपस्टिनशी असलेल्या संबंधांचा उल्लेख झाल्याने अमेरिकेच्या राजकारणात वादाला तोंड फुटले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

या कागदपत्रांमध्ये पाश्चात्य देशांमधील लोक भारतातील सुमारे ५ हजार वर्षे जुन्या आयुर्वेदावर आधारित मसाज आणि उपचार पद्धती स्वीकारत असल्याचा उल्लेख आहे. 'द आर्ट ऑफ गिव्हिंग मसाज' या लेखाचा संदर्भ देत तितळाच्या तेलाच्या मालिशमुळे शरीरातील विषद्रव्ये बाहेर टाकण्यास मदत होते असे नमूद करण्यात आले आहे. आयुर्वेदाला नैसर्गिक आणि पारंपरिक उपचार पद्धत असे म्हटले आहे. मात्र, याच फाईल्समध्ये मसाजच्या नावाखाली



अल्पवयीन मुलींच्या शोषणासंदर्भातील धक्कादायक माहितीही नमूद आहे. काही कागदपत्रांमध्ये मसाज प्रशिक्षणाच्या नावाखाली मुलींना क्लायंटकडे पाठवण्याच्या सूचनांचा उल्लेख आहे.

## २६ डिसेंबरपासून रेल्वेची भाडेवाढ ५०० किमीला १० रुपये वाढणार

■ नवी दिल्ली

**येत्या** २६ डिसेंबरपासून रेल्वे भाडेवाढ केली जाणार आहे. सुधारित भाड्यानुसार, नॉन-एसी डब्यात ५०० किमीपर्यंत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना १० रुपये अतिरिक्त द्यावे लागतील. मात्र ही भाडेवाढ उपनगरीय (लोकल) सेवा आणि मासिक सीझन तिकिटांवर लागू होणार नाही. सामान्य वर्गात २१५ किमीपर्यंतच्या प्रवासासाठी भाडेवाढ होणार नाही.

मेल व एक्स्प्रेस गाड्यांमधील नॉन-एसी डब्यांसाठी प्रति किमी २ पैसे वाढ करण्यात आली आहे. एसी वर्गासाठीही प्रति किमी २ पैसे वाढ केली आहे. या भाडेवाढीतून चालू वर्षात सुमारे ६०० कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे.

## आसाममध्ये बांगलादेशींना वसवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न! मोदींचा नवा आरोप

■ गुवाहाटी

**काँग्रेस** पक्ष राष्ट्रविरोधी विचारसरणीला प्रोत्साहन देत असून, आसाममध्ये बांगलादेशी घुसखोरांना वसवू इच्छित आहे, असा आरोप पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसवर केला. मोदी यांनी आज आसाममधील डिब्रूगढ जिल्ह्यातील नामरूप येथे जाहीर सभेला संबोधित केले. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले.

मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात आसामी भाषेत केली आणि गुवाहाटी विमानतळाच्या नव्या टर्मिनलसाठी जनतेचे अभिनंदन केले. या सभेत पुढे बोलताना मोदी म्हणाले की, काँग्रेसला आसामच्या लोकांची ओळख




जपण्यापेक्षा केवळ आपल्या मतपेढीचीच चिंता आहे. बेकायदेशीर स्थलांतरितांवर अवलंबून असल्यामुळेच काँग्रेस मतदारयादीच्या शुद्धीकरणाला विरोध करत आहे. काँग्रेस पक्ष आजही राष्ट्रविरोधी विचारसरणीला प्रोत्साहन देत आहे. हे लोक आपली मतपेढी मजबूत करण्यासाठी बांगलादेशी घुसखोरांना आसामच्या जंगलांमध्ये आणि जमिनींवर वसवू इच्छित आहेत. तुमचे नुकसान झाले तरी त्यांना काही फरक पडत नाही. काँग्रेसला ना आसामची चिंता आहे, ना येथील लोकांची, ना तुमच्या ओळखीची. त्यांना फक्त सत्ता, सरकार आणि जुन्याच चुकीच्या पद्धती चालू ठेवायच्या आहेत. म्हणूनच ते बेकायदेशीर

» पान ७ वर

## लष्कराच्या माजी अग्निवीरांसाठी आता सीमा सुरक्षा दलात ५० टक्के कोटा

■ नवी दिल्ली

**देशातील** माजी अग्निवीरांना आता बीएसएफ अर्थात सीमा सुरक्षा दलात ५० टक्के कोटा निश्चित करण्यात आला आहे. यामुळे लवकरच



इतर केंद्रीय पोलीस दलांतही असाच कोटा मिळण्याची अपेक्षा आहे. यामुळे सैन्यातून बाहेर पडल्यानंतर भविष्याबद्दल चिंताग्रस्त असलेल्या ७५ टक्के अग्निवीरांना हा मोठा दिलासा आहे.

केंद्रीय गृह मंत्रालयाने बीएसएफ कॉन्स्टेबल भरतीसाठी माजी अग्निवीरांसाठीचा कोटा १० टक्क्यांवरून ५० टक्के केला आहे. गृह मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, बीएसएफमध्ये कॉन्स्टेबल स्तरावरील भरतीत ५० टक्के कोटा माजी अग्निवीरांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या अधिसूचनेद्वारे गृह मंत्रालयाने बीएसएफ जनरल ड्यूटी कॅडर (अराजपत्रित) भरती नियम, २०१५ मध्ये सुधारणा केली आहे. १८ ते २३ वयोगटातील उमेदवार या पदांसाठी अर्ज करू शकतात. माजी अग्निवीरांच्या पहिल्या बॅचमधील उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत आणि त्यानंतरच्या बॅचमधील उमेदवारांसाठी तीन वर्षांपर्यंत शिथिल केली जाईल.

## अंडरवर्ल्ड डॉन हाजी मस्तानच्या मुलीवर अत्याचार नरेंद्र मोदी-शहांकडे न्यायाची मागणी

■ मुंबई

**अंडरवर्ल्ड** डॉन हाजी मस्तान यांची मुलगी हसीन मस्तान यांनी आपल्यावर वारंवार लैंगिक अत्याचार झाल्याचा गंभीर आरोप करत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे न्यायाची मागणी केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून न्यायासाठी संघर्ष करत असूनही अद्याप न्याय मिळालेला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

हसीन मस्तान म्हणाल्या की, १९९६ मध्ये माझा जबरदस्तीने बालविवाह माझ्या मामाच्या मुलाशी लावून देण्यात आला. त्या व्यक्तीने माझ्यावर लैंगिक अत्याचार केले, शारीरिक व मानसिक छळ केला, मला ठार मारण्याचा प्रयत्न झाला आणि मालमत्ता हडपण्यासाठी माझी ओळखही लपवण्यात आली. त्याने माझ्याआधी आठ वेळा विवाह केले होते. या जबरदस्तीच्या लग्नामुळे मला प्रचंड मानसिक आघात सहन करावा लागला असून, मी तीन



वेळा आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यावेळी मी अल्पवयीन होते. मला घराबाहेर काढण्यात आले. मात्र त्या काळात कोणीही माझ्या पाठीशी उभे राहिले नाही. त्यामुळे मी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे न्यायाची मागणी केली आहे. या प्रकरणाशी आपल्या वडिलांचे नाव जोडू नये, अशी भावनिक विनंतीही त्यांनी केली. त्या म्हणाल्या की, ही माझी वैयक्तिक लढाई आहे.

## राडा-गोळीबाराने गाजलेल्या अंबरनाथमध्ये शिंदेंचे वर्चस्व

■ अंबरनाथ

**राडा,** गोळीबार, उमेदवारांना धमक्या आणि बोगस मतदारांच्या आरोपांमुळे चर्चेत राहिलेल्या अंबरनाथ नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने २२ जागांवर विजय मिळवत आपला बालेकिल्ला कायम राखला आहे. भाजपाने ११ जागांवर विजय मिळवला असून, काँग्रेसला १२ तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला ४ जागा मिळाल्या आहेत.

या निवडणुकीत भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. विशेष म्हणजे, शिंदे गट-भाजपा युतीतील फोडाफोडीचा वाद जो दिल्लीपर्यंत पोहोचला होता त्याची सुरुवात अंबरनाथ येथूनच झाली होती. याच ठिकाणी भाजपाने शिवसेनेचे नगरसेवक फोडल्याचा आरोप शिंदे गटाने केला होता.

अंबरनाथमध्ये राज्यस्तरीय नेत्यांनी थेट मैदानात उतरून प्रचार केला. भाजपाकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः

» पान ७ वर

## कोकणातील जनतेचे प्राण संकटात? काँग्रेसचा सरकारला थेट सवाल

■ मुंबई

**रत्नागिरी** जिल्ह्यात उभारली जाणारी एक खासगी कंपनी कोकणातील जनतेच्या जीवाशी खेळ करणारी ठरू शकते, असा गंभीर आरोप काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी कंटेंट क्रिएटर तरुण कुमार केडिया यांचा व्हिडिओ शेअर करत संभाव्य धोक्यांकडे लक्ष वेधले आहे.

या व्हिडिओत इटलीतील विकेन्झा येथील मिटनी नावाच्या केमिकल कारखान्याची माहिती देण्यात आली आहे. या कारखान्यामुळे परिसरातील पिण्याच्या पाण्यात 'पीएफए' हे अत्यंत घातक केमिकल मिसळले गेले. हे फॉरेव्हर केमिकल म्हणून ओळखले जाते, कारण ते कधीही नष्ट होत नाही. परिणामी हजारो नागरिकांच्या शरीरात हे केमिकल साठले गेले आणि मोठ्या प्रमाणावर आजार बळावले. इटलीच्या आरोग्य मंत्रालयाच्या अहवालानुसार, मानवी शरीरात पीएफएचे प्रमाण ठराविक मर्यादेपेक्षा कैकपटीने जास्त आढळून आले. या प्रकरणाचा फटका साडेतीन लाखांहून अधिक नागरिकांना बसल्यानंतर इटली सरकारने संबंधित कारखाना बंद करत दोषींना तुरुंगात डांबले.

## काँग्रेस ज्येष्ठ नेत्याच्या पुतण्याची आत्महत्या

■ जालना

**जालना** शहरात सागर श्रीराम धानोरे (३५) या प्रॉपर्टी डिलिंग उद्योजकाने स्वतःच्या कारमध्ये डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. सागर हा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. पंडितराव धानोरे यांचा पुतण्या असल्याची माहिती आहे. शहरातील भवानीनगर परिसरात सागर राहत होता आणि काल रात्रीपासून तो बेपत्ता होता. आज पहाटे अंबड चौफुली ते मंठा चौफुली दरम्यान कलावती हॉस्पिटलजवळ एक कार संशयास्पदरित्या उभी असल्याचे स्थानिकांच्या लक्षात आले. कार बराच वेळ तिथेच उभी असल्याने नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले असता कारच्या ड्रायव्हिंग सीटवर त्याचा मृतदेह आढळून आला. सागरने उजव्या बाजूने डोक्यात गोळी झाडली असून गोळी कवटी आरपार गेली आहे.

## मेस्सीला स्पर्श व गळाभेटीमुळे अस्वस्थता

**आयोजकांचा दावा**

■ कोलकाता



**कोलकात्यातील सॉल्ट लेक स्टेडियममध्ये १३ डिसेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमातून फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी ठरलेल्या वेळेपूर्वीच निघून गेल्याबाबत नवी माहिती उघड झाली आहे. कार्यक्रमादरम्यान मेस्सीला स्पर्श करण्याचा आणि गळाभेटीचा प्रयत्न झाल्याने तो अस्वस्थ झाला आणि त्याने कार्यक्रम अर्धवट सोडल्याचा दावा मुख्य आयोजक सताद्रु दत्ता यांनी एसआयटीच्या चौकशीत केला आहे. या प्रकरणी सताद्रु दत्ता यांना अटक करण्यात आली आहे.**

**दत्ता** म्हणाले की, परदेशी सुरक्षा यंत्रणांनी आयोजकांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, मेस्सीला स्पर्श करणे किंवा गळाभेट घेणे अजिबात मान्य नाही. मात्र, कार्यक्रमात गर्दी नियंत्रणाबाहेर गेली. व्यासपीठावरून वारंवार सूचना देऊनही प्रेक्षकांनी नियम पाळले नाहीत. मेस्सीला चोहोबाजूंनी घेरले गेले आणि काही जणांनी त्याला मिठी मारण्याचा प्रयत्न केला, जे पूर्णपणे अस्वीकार्य होते. यामुळेच त्यांनी कार्यक्रम सोडण्याचा निर्णय घेतला. ग्राऊंडवर मोठ्या संख्येने लोकांना प्रवेश कसा मिळाला, याचाही तपास सुरू आहे. सुरुवातीला केवळ १५० ग्राऊंड पास देण्यात आले होते. मात्र एका प्रभावशाली व्यक्तीच्या आगमनानंतर ही संख्या तिप्पट करण्यात आली. ते पुढे म्हणाले की, मेस्सीच्या भारत दौऱ्यासाठी सुमारे ८९ कोटी रुपये मानधन देण्यात आले, तर ११ कोटी रुपये कर म्हणून भरावे लागले. एकूण खर्च सुमारे १०० कोटी रुपये झाला. यापैकी ३० टक्के रक्कम प्रायोजकांकडून आणि ३० टक्के तिकीट विक्रीतून मिळाले.

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

लोअरपरेल रोज 600 प्रमाणे बुधवारी पगार, ट्रेनपास + ओव्हरटाईम, काम 8 ते 5 , बिल्डिंगवरील टाक्यांची सफाई करण्यासाठी गरजू आणि मेहनती युवकांसाठी **9821819036 / 9320080200** {NC253477}

अंबरनाथ स्टेशनजवळ प्रिन्टींग प्रेसमध्ये पंचिंग मशीन ऑपरेटर पाहिजे. संपर्कः **9819853443, 9321020846, 9820892324** {NC253457}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकींगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact: **8169999128.** {NC253445}

मुंबईतील प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला वॉटर प्युरिफायर सर्विस टेक्निशियन पाहिजेत फिक्स पगार व कमिशन फ्रेशर्सना ट्रेनिंग दिले जाईल. संपर्क- **8097070483** {NC253469}

इलेक्ट्रिक कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार - 12,000/- ते 21,000/- गाडीभाडे मिळेल. **8108151170 / 7738816123** {NC253471}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत. पगार- 27,500/- (12 तास). **8291917060 / 9819191361** {NC253572}

बँक जॉबसाठी मुले-मुलींची भरती. पगार 18,800/- ते 45,500/- **7219228771** {NC253478}

स्टीकर कंपनीसाठी बॅकऑफिस स्टाफ / QC, बाईंडर / पंचींग ऑपरेटर आणि हेल्पर पाहिजेत. पत्ता-स्टिक प्रिंट, चंद्रछाया बिल्डिंगजवळ, म्हात्रे कंपाऊंड, ललितकाटा, मानपाडा, डोंबिवली (पूर्व)- 421204. मोबाईल- **9819585325 / 9082218279** {NC253416}

परेल येथे ऑफिससाठी फ्रेशर्स ऑफिस असिस्टंट आणि मार्केटिंगसाठी पाहिजेत. **9920053121** {NC253488}

## पाहिजेत

डोंबिवली MIDC PHASE1 येथे रोटरी लेबल प्रिंटिंग/ पंचिंग मशीन ऑपरेटर पाहिजेत. **9820223065/ 9820223081** {NC253459}

DTP, Corel Draw Designer- उत्तम वेतन. काम करताना, Flex-Digital प्रिंटिंग, Vinyl कटिंग, 3D Design, शिकण्याची संधी- **9324804793** {NC253464}

सुरक्षारक्षक / हाऊसकिपिंग/ पॅन्ट्रीबॉय.- दादर, ठाणे- कोळशेत, गोवंडी, वरळी, चेंबूर, मुंबई-सेंटर, माटुंगा, भायखळा **8291056761 / 8422880515 / 8422880514** {NC253420}

कारीगर पाहिजे-ऑफसेट प्रिंटर (हाइडेलबर्ग २-कलर/ 28 x 40 / सीडी, सीपी ट्रॉनिक मशीन ), बाईंडर, स्क्रीनप्रिंटर, फॉइलिंग, लॅमिनेशन, कोरुगेशन ऑपरेटर, कांदिवली बॉक्स कंपनी + **917506719548** {NC253501}

कांदिवलीतील प्रिंटिंग / पेकेजिंग कंपनी मध्ये Jr. & Sr. प्रोडक्शन सुपर्व्हिसर, प्री-प्रेस ऑपरेटर पाहिजे. **+917506719548** {NC253502}

त्वरित भरती सिक्युरिटी गार्ड- 8 तास ड्युटी, मुलुंड, ठाणे, कळवा, कल्याण कोळसेवाडीसाठी. संपर्क - **9220668889** {NC253503}

Sanskruti Printing & Graphics 4 Col 28x40 Komori Auto Plate प्रिंटर, फिडरमॅन, बॉयलर, बाईंडर, 20x28 1 Col Heidelberg प्रिंटर, Sales Marketing Executive & Printing Diploma / Supervisor पाहिजे मो. **9819231111** {NC253504}

बीकेसी येथे ऑफिसमध्ये पार्टटाईम हेल्पर पाहिजे. पगार- 10000. फोन- **9029985564** {NC253424}

## पाहिजेत

पाहिजेत वेल्डर फिटर टर्नर, डायमेकर भेटाः अ-४६ गिरीराज इंडस्ट्रीअल इस्टेट, महाकाली रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई- ४०००९३ मो. **9867145257** {NC253505}

इलेक्ट्रिकल साईट सुपरवायझर आणि वायरमन अनुभवी उमेदवार पाहिजेत मुंबई आणि नवी मुंबईतील साईटसाठी. पगार अनुभवानुसार संपर्कः **9833454582** Email : admin@remwo.in {NC253506}

अंधेरीमधील लॉजिस्टीक कंपनीला डिलीवरीबॉईज पाहिजेत. पगार १६,०००/- ते २०,०००/- वयोमर्यादा १८ ते ३२ वर्षे, शिक्षण- दहावी. तसेच टाटाएस व इलेक्ट्रिक ३ व्हीलरकरीता ड्रायव्हर पाहिजेत. अंधेरी जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्क करा- मॅक्स कुरीयर अ‍ॅण्ड कार्गो, गाळा नं.-28, मखारीया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपर बॉक्सजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400093 फोन - **9320101188** {NC253440}

मरीनलाईन्स ऑफिसमध्ये साफसफाई, इतर कामासाठी लेडी प्यून पाहिजे. वय 30 पर्यंत वेळ- (10.00 - 6.30 ) पगार 10,000/- शिक्षण - दहावी. ॲडव्होकेट जैन **9820113939** {NC253480}

दादर येथील संस्थेला सकाळी 10:30 ते सायं. 7:30 या वेळेत मराठी भाषिक वॉचमन हवा आहे. जवळ राहणाऱ्यांना प्राधान्य पगार रु.12,000/- आहे. संपर्कः ॐ समर्थ भारत व्यायाम मंदिर बाळ गोविंददास रोड, यशवंतराव नाट्यगृह शेजारी, माहीम- माटुंगा, मुंबई 400016 फोन.: **7039616340** {NC253455}

पीसीबी असेंब्लींग आणि एसएमडी सोल्डरिंगसाठी महिला पाहिजेत. अनुभव २ ते ४ वर्ष गोरेगाव पश्चिम संपर्क : **8828029775 / 9820059775** {NC253519}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC253521}

## पाहिजेत

लॉजिस्टीक कंपनीला मुंबई, नवीमुंबई आणि पनवेलकरिता अनुभवी पिकअपबॉईज पाहिजेत. तसेच अनुभवी अकाऊंटंट 2 पदे (upto Finalization), रिसेप्शनिस्ट, बॅंक ऑफिस स्टाफ आणि टाटाएस ड्रायव्हर पाहिजेत. आकर्षक पगार+अलाऊंस. संपर्क करा- Unique Air Freight, 2A, प्लॅनेट इंडस्ट्रीयल इस्टेट, युनायटेड इंकसमोर, ऑफ सुभाष रोड, गरवारेच्या मागे, विलेपारले (पूर्व) {NC253520}

घरातील रुग्णाची काळजी घेण्यासाठी ब्युरोमध्ये अनुभवी आया 12 तासांसाठी पाहिजे. फक्त दिवसपाळी. पगार- 21,000/- **9920463209** {NC253522}

त्वरित पाहिजे टायपिंग करण्यासाठी मुलगा किंवा मुलगी अनुभवी-बिन अनुभवी चालेल. वयाची मर्यादा नाही. M. No. **9819411168** {NC253470}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, DRIVER, नर्स, पेशंटकेअर, (Male + Female) पाहिजेत. (राहणेखाणे+ पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे **9136404828** {NC253422}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुली पाहिजेत. दहिसर ईस्ट. फोन- **7021374861** {NC253482}

हेल्पर कामासाठी, पुरुष कामगार पाहिजेत, चांगला पगार. संपर्क- **8779626615** {NC253515}

ठाणे येथील दातांच्या दवाखान्यासाठी 'डेंटल असिस्टंट' त्वरीत पाहिजे. वय 18 ते 25 चांगला पगार संपर्कः **8108405133** {NC253516}

## शैक्षणिक

इंडस्ट्रियल हीटर रिपेरिंग आणि ट्रेडिंग कोर्स **8108109494 / 7391991578** {NC253486}

## व्यवसायविषयक

सुवर्णसंधी! स्वतःचा व्यवसाय करून दिवसा ३०००/- कमविण्याची. अनिरुद्धा ग्रुप दादर- **8652643434 / 9076403434** {NC253268}


# भारतीय क्रांतिकारक आणि मराठी नाटककार


# गंगाधर विश्वनाथ उर्फ नानासाहेब गोखले

संजीव वेलणकर
पुणे

नानासाहेब गोखले यांच्या काळात पत्रकारितेबरोबरच नाट्यलेखन करणं ही फारच नैसर्गिक क्रिया झाली होती. या नैसर्गिक रीतीला धरून गोखल्यांनी ऐतिहासिक, पौराणिक आणि अस्सल सामाजिक म्हणता येतील अशी पंचवीसेक नाटकं लिहिली. त्यातलं 'संगीत प्राणप्रतिष्ठा' नामक नाटक स्वराज्याचं तोरण बांधण्याच्या ऐतिहासिक प्रसंगावर, तर 'संगीत सैरंध्री' हे कीचकवधावर आधारलेलं नाटक होतं. 'विद्यार्थी', 'कॉलेजकुमारी', 'बुवाबाजी', 'बहीणभाऊ', 'निर्वासित' ही त्यांची संपूर्ण सामाजिक विषयांवरील नाटकंही लोकप्रिय झाली होती. 'बालमोहन नाटक मंडळी' आणि 'अरुणोदय' अशा नाटक कंपन्याही त्यांनी काढल्या असं कुठे कुठे नमूद केलेलं आहे.

**१९०९ च्या बॉम्ब कट खटल्यात गोखले यांना सक्तमजुरी भोगावी लागली होती. त्यानंतर काही काळ ते टिळकांसोबत होते. याच सुमारास ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाला तोंड फुटलं तेव्हा 'साप्ताहिक संग्राम' आणि 'विजय धर्म' अशी दोन वृत्तपत्रे चालवून त्यांनी हे वाद चांगलेच जिवंत ठेवले. याशिवाय त्यांनी विविध वृत्तपत्रांतून कृष्णद्वैपायन, शिवगंगाधर या टोपणनावांनी लिखाण केलं असं म्हणतात. माझ्या माहितीप्रमाणे 'कृष्णद्वैपायन' या नावाने नानासाहेब गोखल्यांनी सडेतोड नाट्यसमीक्षाही केली.**

नानासाहेब गोखल्यांनी लिहिलेल्या नाटकांपैकी काहीच रंगभूमीवर आली. त्यांच्या नाटकांमध्ये 'संगीत विद्यार्थी' हे विद्यार्थ्यांच्या प्रवृत्तीविरोधावर बेतलेलं नाटक जसं आहे, तसंच 'कॉलेजकुमारी' हे नाटक फॅशनच्या आहारी गेलेल्या तरुणीच्या जीवनशैलीचं चित्रण करणारं नाटकही आहे. 'नवे राज्य' या नाटकातून त्यांनी एका प्रथितयश साहित्यिकाच्या ढोंगी व्यवहाराचं चित्र रेखाटलं आहे. या सामाजिक नाटकांशिवाय त्यांनी 'संगीत सैरंध्री' हे पौराणिक नाटकही लिहिलं आहे. या शाहिराची कहाणी राम जोशी यांच्याशी नातं सांगणारी आहे. नानासाहेब गोखले यांचं 'महारवाडा' हे नाटक आहे १९३५ मधलं. हा काळ ब्राह्मण-ब्राह्मणेतर यांच्यातल्या संघर्षाने व्यापलेला काळ आहे. यापूर्वी आपण गोखल्यांनी चालवलेल्या दोन वृत्तपत्रांचा उल्लेख पाहिला आहे. मात्र, त्या काळाच्या पूर्वी आणि या वृत्तपत्रांना समांतर अशी काही ज्वालाग्राही, हट्टी आणि जबरदस्त फॅन फॉलोइंग असणारी साप्ताहिकं, पाक्षिकं, दैनिक वृत्तपत्रंही तेव्हा अस्तित्वात होती. त्यात श्रीपतराव शिंदे यांनी १९१९ पासून बत्तीस वर्ष अपार निष्ठेने चालवलेलं 'विजयी मराठा', १९१७ पासूनचं सत्यशोधकीय 'जागृती', १८७७ पासून कार्यरत असणारं कृष्णराव भालेकरांचं 'दीनबंधु', गणपतराव पाटलांचं 'दीनमित्र', शिवराम महादेव परांजपे यांचा 'काळ' आणि १९२८ मध्ये डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक-राजकीय ऊर्जेतून निर्माण झालेलं 'समता' यांचा उल्लेख अपरिहार्यच आहे. यात 'केसरी' आणि भोपटकरांचा 'भाला'ही अतितीक्ष्ण क्षेपणास्त्रे मिळवली की त्या काळात केवढे वैचारिक राडे रोजच्या रोज घडत असतील याची पुसटशी का असेना, कल्पना आपल्याला येऊ शकते.



नानासाहेब गोखले यांनी हे नाटक लिहिण्यापूर्वी महाराष्ट्रात सामाजिक आणि नंतर राजकीय दृष्टीने फार मोठी उलथापालथ घडवून आणणाऱ्या दोन अनन्य मोलाच्या मोठ्या घटना घडल्या होत्या हे आपण विसरतो म्हटलं तरी विसरून चालणार नाही. एका दिशेला महात्मा गांधी यांची अस्पृश्यता अंताची प्रामुख्याने फिलॉसॉफिकल वा वैचारिक स्तरावरची चळवळ आणि दुसऱ्या बाजूला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यतेविरोधात मांडलेला एल्गार! लक्षात घ्या, 'महारवाडा' अवतरला तेव्हा डॉ. आंबेडकरांनी नेतृत्व केलेल्या चवदार तळे आंदोलनाला नऊ आणि काळाराम मंदिर प्रवेशाला पाच वर्षे होऊन गेली होती. त्यात भर म्हणजे १९३५ मध्येच त्यांनी धर्मांतराची घोषणा केली होती. प्रत्यक्षात धर्मांतराची घटना घडली १९५६ मध्ये. या सर्व घटना इतक्या तीव्र आणि इतका दूरगामी परिणाम घडवून आणणाऱ्या होत्या, की या घटना घडण्यापूर्वी आणि नंतर संपूर्ण महाराष्ट्रात एक अतुलनीय अशी सामाजिक घुसळण घडून आली. या घुसळणीचे परिणाम सवर्ण-अस्पृश्य अशा दोन्ही समाजांच्या तोवरच्या परस्परसंबंधांवर आणि गावगाड्यावर पडत होते. यात पुराणमतवादी वा सनातनी, इंग्रजी विद्या अंगी बाणवलेले नवमतवादी, सुधारक असे सारेच आपापल्या भूमिकांचा रेटा वाढवत होते. याच सामाजिक घुसळणीच्या प्रभावात समाजातील अनेक भेदाभेदांनी सामाजिक आणि पर्यायाने राजकीय वातावरणाचा अवकाश व्यापून टाकला होता. या काळात ब्राह्मण-ब्राह्मणेतर, शिक्षित-अशिक्षित, महार-मराठे, मराठे-ब्राह्मण, मराठा-महार आणि मराठे-मराठेतर यांच्यातलं शत्रुत्व म्हणा, स्पर्धा म्हणा, अतिजहाल होऊन पार विकोपाला गेली होती. डॉ. आंबेडकरांनी घडवून आणलेली आंदोलनं म्हणजे प्रकट एल्गार असला तरी त्याची सुरुवात महात्मा फुले यांनी आणि त्यांच्याही अगोदर काही प्रमाणात लोकहितवादींनी केली होती असं म्हणता येईल. गोखले यांचा 'महारवाडा' हे नाटक तीन अंकी, तिन्ही अंकांत मिळून तेरा प्रवेशी आणि चक्क एकवीस पदांनी नटलेलं आहे.

# जेजुरीत विजयी मिरवणूक! भंडाऱ्याचा भडका

■ जेजुरी

**१६ जखमी**

**जेजुरी** नगरपरिषदेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आज दुपारी गडाच्या पहिल्या पायरीजवळ भंडारा अर्पण करताना आगीचा भडका उडाला. त्यात १६ जण होरपळले. या निवडणुकीत निवडून आलेल्या राष्ट्रवादीच्या नगरसेविका मोनिका राहुल घाडगे व त्यांचे पती राहुल घाडगे आणि प्रभाग क्र.५ मधून निवडून आलेल्या राष्ट्रवादीच्या नगरसेविका स्वरूपा खोमणे आदींचा समावेश आहे. जखमींना तातडीने येथील खासगी व सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

नगरपरिषद निवडणुकीतील विजयानंतर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी जेजुरीत विजय मिरवणूक काढली होती. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि भंडाऱ्याच्या उधळणीत हा जल्लोष सुरू होता. जेजुरी गडाच्या ऐतिहासिक कमानीजवळ मिरवणूक पोहोचली असताना कापूर जाळण्यात येत होता. त्याच वेळी जळत्या कापुरावर मोठ्या प्रमाणात भंडारा पडल्यामुळे अचानक मोठा भडका उडाला. त्यात १६ जण जखमी झाले.

# माळेगावात अजित पवार गटाला धक्का! ईश्वर चिठ्ठीचा निर्णय

**पुणे** - बारामती तालुक्यात नव्याने स्थापन झालेल्या माळेगाव नगरपंचायतीच्या निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला. नगरसेवकपदासाठी झालेल्या निवडणुकीत दोन उमेदवारांना समान मते मिळाल्याने ईश्वरचिठ्ठीद्वारे निकाल लावण्यात आला. यात अपक्ष उमेदवाराचे नाव होते.

माळेगाव नगरपंचायतीतील एका प्रभागात गायत्री राहुल तावरे आणि जयश्री बाळासाहेब तावरे या दोन्ही उमेदवारांना समान मते मिळाली. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी नियमानुसार लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठी काढून विजेता ठरवला. या ईश्वरचिठ्ठीत अपक्ष उमेदवार जयश्री बाळासाहेब तावरे यांचे नाव निघाल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले. ईश्वर चिठ्ठीच्या माध्यमातून अपक्ष उमेदवाराचा विजय झाल्याने हा निकाल चर्चेचा विषय ठरला आहे.

# आजचे राशी भविष्य

सोमवार
दि. २२ डिसेंबर २०२५

ज्योतिष पंडीत
अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | कार्यक्षेत्रात कामांना गती येईल. नवीन गुंतवणूक फायदेशीर ठरेल. कलाक्षेत्रातील लोकांना अनुकूल दिवस राहील. |
| वृषभ | कार्यक्षेत्रात कामाची गती मंदावल्यासारखी वाटेल. नोकरीच्या शोधात असणाऱ्यांना लाभदायक दिवस ठरेल. वडिलोपार्जित मालमत्ता मिळण्याचे योग. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात जिद्दीने यश मिळवाल. आर्थिक लाभ चांगले होतील. नोकरीमध्ये अधिकारप्राप्तीचे योग. |
| कर्क | वडिलोपार्जित व्यवसायामध्ये यश मिळेल. नोकरीनिमित्त दूरचा प्रवास वाढू शकतो. वास्तुसंबंधित कामे मार्गी लागतील. |
| सिंह | योजलेल्या कामांमध्ये यश मिळेल. सामाजिक क्षेत्रात नावलौकिक शिमळवाल. दानधर्मातून आनंद मिळेल. |
| कन्या | व्यावसायिक प्रवास फायदेशीर ठरेल. घरामध्ये एखाद्या समारंभाचे आयोजन कराल. गुरुजनांचा आशीर्वाद लाभेल. |
| तूळ | आधी केलेल्या गुंतवणुकीतून चांगला फायदा होऊ शकतो. नोकरीमध्ये नवीन जबाबदारी चांगल्या रीतीने पार पाडाल. मित्रमंडळींचे सहकार्य राहील. |
| वृश्चिक | व्यवसायाच्या स्वरूपात काही बदल करावेसे वाटतील. विविध प्रकारच्या माध्यमातून आर्थिक लाभ मिळवाल. कुटुंबीयांचे सहकार्य चांगले राहील. |
| धनु | कार्यक्षेत्रात नवीन आव्हाने पेलण्यास सक्षम राहाल. वडिलधाऱ्यांचा सल्ला फायदेशीर ठरेल. संततीबाबत शुभघटना घडतील. |
| मकर | कार्यक्षेत्रात काही अडचणी आल्यातरी त्यावर मार्ग काढाल. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राखावी लागेल. सरकारी कामांमध्ये यश मिळेल. |
| कुंभ | भागीदारी व्यवसायामध्ये आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात करण्याचे योजाल. वडिलधाऱ्यांचा सल्ला उपयोगी पडेल. आरोग्य उत्तम राहील. |
| मीन | सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. तुमच्या कार्याचा गौरव होईल. व्यावसायिक प्रवास फायदेशीर ठरेल. |

# देवगड समुद्रात कर्नाटकची नौका जप्त

■ देवगड

**महाराष्ट्राच्या** सागरी हद्दीत अवैधरित्या मच्छिमारी करणाऱ्या कर्नाटकमधील परप्रांतीय नौकेवर मत्स्यव्यवसाय विभागाने कारवाई केली. देवगड समुद्राच्या हद्दीत सुमारे १४ वाव क्षेत्रात विनापरवाना मच्छिमारी करताना ही नौका आढळली.

याप्रकरणी एकास अटक करण्यात आली. मत्स्यव्यवसाय विभागाचे पथक समुद्रात गस्त घालत असताना काल पहाटे कारवाई करण्यात आली. नौका ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी देवगड बंदरात आणण्यात आली. या नौकेवर तांडेलसह ७ खलाशी आहेत. देवगड मत्स्यव्यवसाय विभागाचे पथक गस्ती नौकेद्वारे काल पहाटे समुद्रात गस्त घालत होते. त्यावेळी देवगड सागरी हद्दीत १४ वाव क्षेत्रात कर्नाटक उडुपी (जि.मलपी) येथील 'महारथी' ही ज्योती एन. हरीक्रांता यांच्या मालकीची मच्छिमारी नौका मासेमारी करताना आढळली. गस्ती पथकाची नौका त्या नौकेजवळ पोहोचताच सदर परप्रांतीय नौकेने पळ काढण्याचा प्रयत्न केला.

# काँग्रेसच्या नेत्यांची आघाडीसाठी प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा

■ मुंबई

**स्थानिक** स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत वंचित बहुजन आघाडीला अभूतपूर्व यश मिळाले आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीमधून मुंबईत आलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी आणि स्थानिक नेत्यांनी आज वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांची भेट घेऊन आघाडीबाबत चर्चा केली.

फुले-शाहू-आंबेडकरवादी विचारधारेवर विश्वास ठेवणाऱ्या वंचित बहुजन आघाडीचे ७० पेक्षा अधिक नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे काँग्रेस आणि वंचितची मुंबई महापालिकेत आघाडी व्हावी अशी चर्चा जोर धरत आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीमधून मुंबईत आलेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी व्यंकटेश आणि काँग्रेस मुंबई कमिटीतील काही पदाधिकाऱ्यांनी दादर राजगृह निवासस्थानी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, युवा नेते सुजात आंबेडकर तसेच पक्षाचे रणनितीकार सुमित आनंद उपस्थित होते.

आंबेडकर आणि काँग्रेस सेक्रेटरी व्यंकटेश यांच्यात यावेळी बैठक झाली. या बैठकीत काँग्रेसकडून स्थानिक स्वराज्य संस्था तसेच राष्ट्रीय पातळीवरील काही प्रस्ताव मांडण्यात आले. मात्र, या प्रस्तावांबाबत अद्याप कोणतीही अंतिम स्पष्टता झालेली नसल्याचे सांगण्यात आले असून, योग्य वेळी याबाबत प्रकाश आंबेडकर माहिती देतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी रवि विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 51 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 21/12/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- GL-04 : 6666

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0092 | 0129 | 1049 | 1971 | 2387 | 4869 | 5457 | 6481 | 7137 | 9429 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0124 | 1780 | 2741 | 3392 | 4696 | 5868 | 8196 | 8394 | 9412 | 9956 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0668 | 1728 | 1989 | 3371 | 4751 | 5363 | 6975 | 7675 | 9025 | 9976 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0337 | 2368 | 3084 | 4308 | 5123 | 6669 | 7047 | 7460 | 7893 | 9348 |

सहावे बक्षिस रु.100/- — सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1069 | 1731 | 2835 | 3473 | 4481 | 5355 | 6456 | 7599 | 8588 | 9239 |
| | | 1091 | 1735 | 2839 | 3551 | 4490 | 5440 | 6476 | 7714 | 8618 | 9285 |
| 0000 | 0440 | 1097 | 1752 | 2842 | 3579 | 4499 | 5513 | 6569 | 7771 | 8673 | 9294 |
| 0002 | 0508 | 1107 | 1762 | 2846 | 3626 | 4548 | 5551 | 6618 | 7777 | 8683 | 9390 |
| 0011 | 0512 | 1117 | 1783 | 2919 | 3773 | 4578 | 5556 | 6671 | 7779 | 8709 | 9419 |
| 0028 | 0571 | 1120 | 1896 | 2939 | 3775 | 4602 | 5652 | 6712 | 7807 | 8739 | 9551 |
| 0060 | 0581 | 1121 | 1955 | 2952 | 3790 | 4624 | 5675 | 6783 | 7852 | 8815 | 9605 |
| 0092 | 0649 | 1165 | 2026 | 3094 | 3853 | 4665 | 5712 | 6838 | 8002 | 8855 | 9676 |
| 0120 | 0710 | 1170 | 2124 | 3182 | 4033 | 4733 | 5859 | 6930 | 8088 | 8863 | 9712 |
| 0131 | 0735 | 1187 | 2281 | 3186 | 4041 | 4764 | 5916 | 6965 | 8113 | 8874 | 9734 |
| 0173 | 0752 | 1193 | 2312 | 3249 | 4064 | 4782 | 6007 | 7147 | 8128 | 8879 | 9785 |
| 0181 | 0810 | 1208 | 2322 | 3262 | 4065 | 4784 | 6047 | 7154 | 8241 | 8884 | 9791 |
| 0190 | 0838 | 1251 | 2334 | 3283 | 4094 | 4806 | 6055 | 7157 | 8262 | 8897 | 9805 |
| 0303 | 0869 | 1287 | 2432 | 3310 | 4216 | 4834 | 6126 | 7274 | 8282 | 8928 | 9837 |
| 0310 | 0908 | 1339 | 2524 | 3326 | 4270 | 4879 | 6137 | 7284 | 8389 | 9007 | 9896 |
| 0312 | 0938 | 1367 | 2532 | 3333 | 4354 | 4914 | 6140 | 7295 | 8439 | 9062 | 9898 |
| 0347 | 1001 | 1511 | 2550 | 3348 | 4438 | 4940 | 6240 | 7307 | 8443 | 9079 | 9920 |
| 0379 | 1016 | 1527 | 2596 | 3360 | 4459 | 4994 | 6257 | 7345 | 8457 | 9119 | 9930 |
| 0394 | 1017 | 1611 | 2670 | 3379 | 4467 | 5057 | 6265 | 7376 | 8484 | 9179 | 9940 |
| 0402 | 1025 | 1639 | 2707 | 3383 | 4468 | 5141 | 6300 | 7379 | 8501 | 9181 | 9949 |
| 0425 | 1034 | 1663 | 2791 | 3401 | 4471 | 5335 | 6378 | 7401 | 8540 | 9190 | 9957 |
| 0426 | 1046 | 1684 | 2824 | 3422 | 4475 | 5354 | 6413 | 7568 | 8585 | 9229 | 9971 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. २२/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| ८ | २ | ७ |
| ८० | २४ | ७४ |
| ८५ | २९ | ७९ |
| १८९ | १३८ | १६० |
| २६० | ४८० | ३६८ |

## निकाल — गणेशलक्ष्मी वैभव विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 51 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 21/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- MG-07 : 3487

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- 0839

तिसरे बक्षिस रु. 2000/- 3457

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0301 | 0966 | 2306 | 4287 | 4701 | 5705 | 6972 | 7245 | 7316 | 9441 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0093 | 0273 | 0396 | 1080 | 3527 | 3969 | 4430 | 5018 | 5430 | 6846 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0595 | 1415 | 2841 | 3052 | 4495 | 6068 | 6264 | 7335 | 7377 | 7534 |

सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) — सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1270 | 2202 | 3417 | 4473 | 5117 | 5954 | 7344 | 8318 | 9280 |
| | | 1321 | 2220 | 3505 | 4479 | 5215 | 6178 | 7361 | 8327 | 9296 |
| | | 1375 | 2231 | 3528 | 4494 | 5242 | 6196 | 7388 | 8387 | 9297 |
| 0007 | 0628 | 1435 | 2298 | 3543 | 4499 | 5257 | 6199 | 7470 | 8427 | 9361 |
| 0008 | 0650 | 1542 | 2402 | 3605 | 4504 | 5260 | 6406 | 7474 | 8450 | 9419 |
| 0033 | 0699 | 1551 | 2420 | 3783 | 4528 | 5294 | 6533 | 7497 | 8575 | 9490 |
| 0039 | 0714 | 1554 | 2426 | 3791 | 4593 | 5357 | 6609 | 7512 | 8580 | 9492 |
| 0047 | 0720 | 1585 | 2437 | 3934 | 4624 | 5416 | 6613 | 7519 | 8826 | 9493 |
| 0061 | 0733 | 1589 | 2484 | 3938 | 4670 | 5509 | 6623 | 7567 | 8828 | 9514 |
| 0069 | 0743 | 1761 | 2563 | 3974 | 4676 | 5534 | 6658 | 7577 | 8847 | 9557 |
| 0075 | 0745 | 1764 | 2652 | 4023 | 4690 | 5538 | 6662 | 7673 | 8866 | 9567 |
| 0198 | 0794 | 1801 | 2722 | 4072 | 4741 | 5544 | 6692 | 7727 | 8868 | 9577 |
| 0220 | 0860 | 1852 | 2762 | 4167 | 4749 | 5553 | 6717 | 7729 | 8938 | 9742 |
| 0221 | 0901 | 1859 | 2784 | 4209 | 4776 | 5563 | 6916 | 7877 | 8978 | 9891 |
| 0307 | 0980 | 1910 | 2825 | 4242 | 4827 | 5569 | 6960 | 7891 | 9007 | 9910 |
| 0404 | 0996 | 1931 | 3015 | 4321 | 4900 | 5606 | 7070 | 7960 | 9022 | 9915 |
| 0470 | 1013 | 1954 | 3065 | 4359 | 4955 | 5614 | 7083 | 8080 | 9081 | 9941 |
| 0489 | 1111 | 2075 | 3223 | 4380 | 4973 | 5706 | 7170 | 8118 | 9163 | 9945 |
| 0500 | 1155 | 2117 | 3263 | 4408 | 5067 | 5708 | 7275 | 8185 | 9183 | 9947 |
| 0520 | 1184 | 2128 | 3321 | 4444 | 5090 | 5734 | 7322 | 8186 | 9197 | 9949 |
| 0533 | 1191 | 2145 | 3347 | 4459 | 5100 | 5865 | 7334 | 8296 | 9202 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र मोहिनी • विकली लॉटरी • — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर रविवार • सोडत क्रमांक 51 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 21/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- MO-04 : 2681

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0006 | 0010 | 0787 | 3237 | 4213 | 6465 | 7418 | 8917 | 9388 | 9862 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0880 | 1085 | 1310 | 1632 | 4035 | 4224 | 7005 | 7317 | 8195 | 8265 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0330 | 0513 | 0977 | 2147 | 2955 | 4407 | 5585 | 8367 | 8620 | 8985 |

पाचवे बक्षिस रु. 300/- — पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1551 | 2490 | 3654 | 4645 | 5513 | 6361 | 7162 | 8298 |
| | 1634 | 2627 | 3733 | 4687 | 5602 | 6391 | 7252 | 8482 |
| 0033 | 1971 | 2937 | 3881 | 4757 | 5633 | 6415 | 7267 | 8728 |
| 0300 | 2072 | 2958 | 3915 | 4807 | 5879 | 6420 | 7302 | 8746 |
| 0301 | 2080 | 3051 | 4055 | 4940 | 5994 | 6549 | 7365 | 8936 |
| 0340 | 2206 | 3059 | 4178 | 5043 | 6025 | 6635 | 7484 | 9099 |
| 0365 | 2228 | 3317 | 4227 | 5075 | 6087 | 6649 | 7620 | 9176 |
| 0460 | 2231 | 3337 | 4236 | 5111 | 6153 | 6801 | 7705 | 9296 |
| 0503 | 2232 | 3375 | 4439 | 5119 | 6164 | 6804 | 7723 | 9493 |
| 0577 | 2245 | 3380 | 4442 | 5297 | 6182 | 6825 | 7817 | 9546 |
| 0610 | 2258 | 3500 | 4445 | 5335 | 6185 | 7053 | 8045 | 9720 |
| 0804 | 2399 | 3623 | 4451 | 5400 | 6259 | 7133 | 8095 | 9779 |
| 0872 | 2448 | 3633 | 4479 | 5465 | 6295 | 7145 | 8238 | 9891 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. • अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पाहावे. • प्रस्तुतकर्ता : महाराष्ट्र राज्य लॉटरी

# माथेफिरूने कॉलेज तरुणीला धावत्या लोकलमधून ढकलले

■ मुंबई

**हार्बर** मार्गावरील पनवेल ते खांदेश्वर स्थानकांदरम्यान एका १८ वर्षीय अभियांत्रिकीच्या विद्यार्थिनीला एका माथेफिरूने धावत्या लोकलमधून खाली ढकलून दिल्याची खळबळजनक घटना घडली आहे. हा ५० वर्षीय माथेफिरू अचानक महिलांच्या डब्यात शिरला होता. याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी तत्परता दाखवत आरोपीस अटक केली. पीडित तरुणी खारघर येथील एका नामांकित शिक्षण संस्थेत अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहे. गुरुवारी सकाळी आठच्या सुमारास तिने आपल्या मैत्रिणीसह पनवेल रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक तीनवरून सीएसएमटीला जाणारी लोकल पकडली. गाडी सुटत असतानाच शेख अख्तर नवाझ (५०) ही व्यक्ती महिलांच्या डब्यात शिरली. डब्यात पुरुष आल्याचे पाहून तेथील काही महिला प्रवाशांनी त्याला जाब विचारला आणि खाली उतरण्यास सांगितले. मात्र, शेखने महिलांशी वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की, रागाच्या भरात शेखने धावत्या लोकलमधून या १८ वर्षीय तरुणीला पाठीमागून जोरदार धक्का दिला.

या धक्क्यामुळे तरुणी थेट रुळांवर कोसळली. ही तरुणी रुळांवर पडल्यामुळे तरुणीच्या डोक्याला, कंबरेला आणि हातापायांना गंभीर दुखापत झाली आहे. जखमी अवस्थेतच तिने आपल्या वडिलांना फोन करून घटनेची माहिती दिली. तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सध्या तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. दुसरीकडे, तरुणीला ढकलल्यानंतर आरोपीने खांदेश्वर स्थानकात उतरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, डब्यातील सतर्क महिला प्रवाशांनी तातडीने रेल्वे पोलिसांना याची कल्पना दिली.

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'

# बालेकिल्ल्यात दानवे पिता-पुत्रांना धक्का
## भोकरदन शरद पवारांकडे

■ जालना

**भाजपाचे** ज्येष्ठ नेते माजी खासदार रावसाहेब दानवे आणि त्यांचे पुत्र तथा भोकरदनचे आमदार संतोष दानवे यांना त्यांच्या बालेकिल्ल्यात पराभव चाखावा लागला आहे. भोकरदन नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या समरीन मिर्झा यांनी ८३० मतांनी विजय मिळवला आहे.

भोकरदन हा जालन्याचे पाच वेळा खासदार राहिलेले रावसाहेब दानवे यांचा बालेकिल्ला मानला जातो. याशिवाय संतोष दानवे हे सलग तीन कार्यकाळ भोकरदनचे आमदार आहेत. त्यामुळे या नगरपरिषद निकालाकडे दानवे पिता-पुत्रांसाठी मोठा धक्का म्हणून पाहिले जात आहे. यापूर्वी लोकसभा निवडणुकीतही शरद पवार गटाच्या कल्याण काळे यांनी रावसाहेब दानवे यांना पराभूत करत धक्का दिला होता. आजच्या विजयानंतर



राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी शहरात जल्लोष करत भव्य मिरवणूक काढली. रावसाहेब दानवे यांच्या घरासमोरच राष्ट्रवादीचे माजी आमदार चंद्रकांत दानवे आणि समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत विजय साजरा केला.

### टोपेंच्या प्रचारालाही अपयश अंबड नगरपरिषद भाजपाकडे

जालना जिल्ह्यातील परतूर आणि अंबड या दोन नगरपरिषदांत भाजपाने आपले वर्चस्व कायम राखले. अंबडमध्ये भाजपाच्या देवयानी कुलकर्णी या नगराध्यक्षपदी विजयी झाल्या आहेत. त्यामुळे अंबडमध्ये भाजपाची पकड अधिक मजबूत झाल्याने शरद पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते राजेश टोपे यांना मोठा राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे. राजेश टोपे अंबडमध्ये स्वत: प्रचारात उतरले होते. मात्र, प्रचाराचा अपेक्षित फायदा राष्ट्रवादीला मिळाला नाही. अंबड विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले तसेच घनसावंगी मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलेले राजेश टोपे यांच्या नेतृत्वावर या निकालामुळे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



# अहिल्यानगरात विखे-पाटील यांचा प्रभाव
## १२ पैकी ७ नगराध्यक्ष भाजपाचे

■ अहिल्यानगर

**अहिल्यानगर** जिल्ह्यातील १२ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदाचे निकाल जाहीर झाले असून, जिल्ह्याच्या राजकारणात भाजपाने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जिल्ह्यातील एकूण १२ पैकी तब्बल ७ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदावर भाजपाने विजय मिळवला आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने २ ठिकाणी यश मिळवले आहे. काँग्रेस आणि महाविकास आघाडीला प्रत्येकी एका जागेवर समाधान मानावे लागले आहे.

राज्याचे महसूलमंत्री विखे-पाटलांनी राहाता नगरपालिकेचा गड राखला आहे. २० पैकी १९ जागेवर भाजपा आणि शिवसेनेच्या उमेदवारांचा विजय झाला आहे. राहाता नगरपालिकेत शहर विकास आघाडीला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले. राहातामध्ये स्वाधीन गाडेकर (भाजप) नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. विखे-पाटील यांच्या नेतृत्वाखालील या एकतर्फी विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठा जल्लोष केला.

संगमनेर नगरपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसचे बाळासाहेब थोरात आणि सत्यजित तांबे या मामा-भाचाच्या जोडीने दणदणीत विजय मिळवला. संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या या निवडणुकीत संगमनेर सेवा समितीच्या उमेदवार आणि विधान परिषद आमदार सत्यजित तांबे यांच्या पत्नी डॉ. मैथिली



डॉ. मैथिली तांबे

तांबे यांनी नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत १६,४०८ मतांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवत इतिहास रचला. ही निवडणूक केवळ नगरपरिषदेपुरती मर्यादित न राहता तांबे-थोरात विरुद्ध खताळ-विखे-पाटील अशा दोन बड्या राजकीय घराण्यांमधील प्रतिष्ठेची लढाई झाली होती.

कोपरगाव नगरपरिषदेत अत्यंत अटीतटीची लढत पाहायला मिळाली. भाजपचे पराग संधान यांनी ४०९ मतांनी विजय मिळवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने जिल्ह्यात दोन ठिकाणी आपला झेंडा फडकवला आहे. शेवगाव नगरपरिषद आणि नेवासा नगरपंचायत या दोन्ही ठिकाणी शिंदेसेनेचे उमेदवार नगराध्यक्षपदी निवडून आत असून, ग्रामीण भागात शिवसेनेने आपले अस्तित्व प्रभावीपणे दाखवून दिले आहे. श्रीरामपूर येथे काँग्रेसने आपले वर्चस्व कायम राखत नगराध्यक्षपद मिळवले आहे.

# पालघर आणि डहाणू शिवसेनेकडे

■ पालघर

**पालघर** जिल्ह्यातील पालघर आणि डहाणू या दोन नगरपरिषदा शिवसेना शिंदे गटाने जिंकल्या आहेत तर भाजपाने पहिल्यांदाच जव्हार नगपरिषद आणि वाडा नगरपंचायत काबीज केली आहे. या जिल्ह्यावर भाजपा-शिवसेनेचेच वर्चस्व दिसून आले.

पालघरमध्ये शिवसेनेने वर्चस्व राखत भाजपाचा पराभव केला. पालघर नगरपरिषदेच्या एकूण ३० जागांपैकी १९ जागा शिवसेना शिंदे गटाने जिंकल्या आहेत. भाजपाचे ८ आणि शिवसेना उबाठाचे ३ नगरसेवक येथे निवडून आले आहेत. डहाणू येथील २७ जागांपैकी भाजपाने १७, शिवसेना शिंदे गटाने २ आणि राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे

### जव्हार, वाडावर भाजपाचा कब्जा

८ जागा जिंकल्या. डहाणूत बहुमत जरी भाजपाचे असले तरी नगराध्यक्षपद शिवसेना शिंदे गटाने जिंकले आहे. राष्ट्रवादीच्या ताब्यात असलेली जव्हार नगरपरिषद भाजपाने काबीज केली आहे. जव्हार नगरपरिषदेच्या २० पैकी १४ जागा भाजपाने जिंकल्या. शिवसेना शिंदे गटाने २ आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाने ३ जागा जिंकल्या. राष्ट्रवादी शरद पवार गटाचा १ नगरसेवक जिंकला आहे.

वाडा नगरपंचायतीमध्येही भाजपाने १७ जागांपैकी ११ जागा जिंकल्या आहेत. शिवसेना शिंदे गट (३) शिवसेना ऊबाठा, काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शप) यांना प्रत्येकी एक जागा मिळाली आहे. पालघर, जव्हार आणि वाडा या तीन ठिकाणी जनतेने ज्या पक्षाला बहुमत दिले. त्याच पक्षाचा नगराध्यक्ष निवडून दिला. डहाणूमध्ये मात्र बहुमत भाजपाला मिळाले असले तरी नगराध्यक्ष शिवसेनेचा झाला आहे.

# लोह्यात भाजपाची घराणेशाही अपयशी
## एकाच कुटुंबातील ६ उमेदवार पराभूत

■ नांदेड

**नांदेड** जिल्ह्यातील लोहा नगरपरिषद निवडणुकीत मतदारांनी घराणेशाहीला स्पष्ट विरोध करत भाजपाला मोठा धक्का दिला आहे. या निवडणुकीत सूर्यवंशी कुटुंबातील तब्बल सहा उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला. राष्ट्रवादी अजित पवार गटाने नगराध्यक्षपदासह १७ जागांवर विजय मिळवला आहे.

लोहामध्ये अजित पवार गटाचे उमेदवार शरद पवार यांनी भाजपाचे माजी नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी यांचा २८२१ मतांनी पराभव केला. भाजपाने नगराध्यक्षपदासह इतर पाच जागांवरही सूर्यवंशी कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी दिली होती. मात्र, या सर्वांनाच मतदारांनी नाकारले.

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या भाजपा प्रवेशानंतर नांदेडमधील ही पहिली स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक ठरली. त्यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढवली जात असताना, एकाच कुटुंबाला ६ जागा दिल्यामुळे चव्हाणांवर नामुष्की ओढवली.

# कोकणात निलेश राणेंना यश

■ सिंधुदुर्ग

**कोकणातील** सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण आणि कणकवली नगरपरिषद निवडणुकांनी राज्याचे लक्ष वेधून घेतले. राणे बंधू आमनेसामने आल्याने ही निवडणूक केवळ स्थानिक सत्तेची न राहता प्रतिष्ठेची लढाई ठरली. कुडाळचे आमदार निलेश राणे यांनी भाजपा पदाधिकाऱ्यांविरोधात पैसे वाटपाचा आरोप करत स्टिंग ऑपरेशन केल्याने महायुतीत तणाव निर्माण झाला होता.

अखेर शिंदे गटाच्या शिवसेनेने सत्ता प्रस्थापित करत ममता वराडकर आणि संदेश पारकर यांच्या विजयातून बाजी मारल्याने निलेश राणे यांनी आपले बंधू आणि मंत्री नितेश राणेंवर मात केल्याचे दिसत आहे. या निकालामुळे भाजपाला त्यांच्याच बालेकिल्ल्यात धक्का बसला



आहे. मालवण नगरपरिषदेवर शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांच्या नेतृत्वात १० जागांवर विजय मिळाला तर भाजपाला फक्त ५ जागांवर समाधान मानावे लागले. कणकवलीत नितेश राणेंच्या बालेकिल्ल्यात भाजपा विरोधात सर्वपक्षीयांनी

### नितेश राणेंना बालेकिल्ल्यात धक्का

शहर विकास आघाडी तयार केली होती. नगरपरिषदेच्या निवडणुकीत भाजपाला ९ तर शहर विकास आघाडीला ८ जागा मिळाल्या. नगराध्यक्षपदी शहर विकास आघाडीचे संदेश पारकर १४५ मतांनी विजयी झाले. याशिवाय सावंतवाडीमध्ये भाजपाला ११, शिंदे गटाला ७, काँग्रेसला १ आणि उबाठाला १ जागा मिळाली. नगराध्यक्षपदी भाजपाच्या श्रद्धा राजे भोसले यांनी ९०० मतांनी विजय मिळवला. वेंगुर्ल्यामध्ये भाजपाचे १६, उबाठाचे ३ आणि शिंदे गटाचा १ उमेदवार विजयी झाला. नगराध्यक्षपदी भाजपाचे राजन गिरफ ४३० मतांनी विजयी झाले.

# रत्नागिरीत महायुतीचा दबदबा
## राजापूरचे नगराध्यक्षपद काँग्रेसकडे

■ रत्नागिरी

**रत्नागिरी,** चिपळूण व खेड नगर परिषदेवर तसेच लांजा नगर पंचायतीवर शिवसेनेने झेंडा फडकवला तर देवरूख आणि गुहागर नगरपंचायतीवर भाजपाचा झेंडा फडकला. मात्र राजापूरच्या नगराध्यक्षपदी काँग्रेसच्या हुस्नबानू खलिपे निवडून आल्या.

उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मतदारसंघातील रत्नागिरी नगरपरिषदेत महायुतीने जोरदार मुसंडी मारत २९ जागा जिंकल्या. विरोधकांना फक्त ३ जागांवर समाधान मानावे लागले. नगराध्यक्षपदी शिवसेनेच्या शिल्पा सुर्वे विजयी झाल्या. चिपळूण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी शिवसेनेचे उमेश सकपाळ हे विजयी झाले असून, त्यांनी १२५८ मतांनी विजय मिळवला. शरद पवार गटाचे माजी आमदार रमेश कदम यांचा मात्र या निवडणुकीत पराभव झाला. तर भाजपाचे उमेदवार शुभम पिसे हे अवघ्या १ मताने नगरसेवक म्हणून निवडून आले. खेड नगरपरिषदेत महायुतीने निर्भेळ यश मिळवत नगराध्यक्षपदासह २१ जागा खिशात घातल्या. तब्बल १४ वर्षांनंतर खेड नगरपरिषदेवर महायुतीने कब्जा केला असून, नगराध्यक्षपदासाठी माधवी बुटाला विजयी झाल्या. त्यांनी २१११ मतांनी सपना कानडे यांचा पराभव केला. शिंदे गटाचे राज्यमंत्री योगेश कदम यांचा हा मतदारसंघ. तिथे भाजपाला ३ व शिवसेनेला १८ जागी यश आले. राजापूर नगरपरिषद नगराध्यक्षपदी काँग्रेसच्या हुस्नबानू खलिपे यांनी विजय नोंदवत आपला परंपरागत गड राखला.

# विजयी होताच गोगावलेंनी गळ टाकला
## उबाठा नगराध्यक्ष शिंदे गटाच्या वाटेवर?

■ श्रीवर्धन

**श्रीवर्धन** नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत मोठा राजकीय उलथापालथ पाहायला मिळाली. उबाठा गटाचे ॲड. अतुल चौगुले यांनी दणदणीत विजय मिळवत महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या मतदारसंघातच तटकरे गटाला धक्का दिला.



निकालानंतर मात्र राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले. निकाल जाहीर होताच शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी ॲड. अतुल चौगुले यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. यावेळी दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र जल्लोष केला. या भेटीनंतर चौगुले शिंदे गटात प्रवेश करणार का, अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.

मात्र चौगुले यांनी या सर्व अफवा फेटाळून लावत, माझा कुठल्याही पक्षात प्रवेश होणार नाही. शिवसेनेचे दोन तुकडे झाले असले तरी शिवसेना एकच आहे. माझ्या विजयात दोन्ही शिवसेनेच्या कार्यकर्त्यांचा मोठा वाटा आहे, असे स्पष्ट केले. तर गोगावले म्हणाले की, काहींची मक्तेदारी मोडून काढत अतुल चौगुले यांनी सर्व पक्षांना सोबत घेत चमत्कार घडवला आहे. शिवसेनेने त्यांना ताकदीने मदत केली असून, ती मदत ते आयुष्यभर विसरणार नाहीत.

महाडमध्येही शिंदे गटाचे सुनील कविस्कर यांनी दणदणीत विजय मिळवला. मात्र रोह्यात वनश्री शेंडगे आणि मुरुडमध्ये आराधना दांडेकर विजयी झाल्याने तटकरेंना काहीसा दिलासा मिळाला आहे. उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या भावना घाणेकर यांनी भाजपाच्या शोभा कोळी शहा यांचा १,४४८ मतांनी पराभव केला. उरणमध्ये २१ नगरसेवक निवडून आले असून, त्यापैकी १२ भाजपाचे तर महाविकास आघाडीतील ९ नगरसेवक विजयी झाले आहेत.

# मंत्रिपद न दिल्याने चंद्रपुरात पराभव! मुनगंटीवार संतापले

■ चंद्रपूर

**चंद्रपूर** जिल्ह्यात भाजपाला जबर धक्का बसला असून, बहुसंख्य नगरपरिषदा भाजपाच्या हातातून निसटल्या आहेत. तिथे काँग्रेस पक्षाची सरशी झालेली पाहायला मिळत आहे. हा निकाल लागताच भाजपा आमदार मुनगंटीवार संतापले. त्यांनी आपल्याच पक्षाला घरचा आहेर म्हटले की, भाजपाने मला तर मंत्रिपद दिल्याने पक्षाचा चंद्रपुरात पराभव झाला. मुनगंटीवार म्हणाले की, विदर्भातील चंद्रपूरद, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या चारही जिल्ह्यांतील एकाही नेत्याला मंत्री केलेले नाही, काँग्रेसने विजय वडेट्टीवार यांना महाराष्ट्राचा नेता केले. पण भाजपाने मला तर मंत्रिपद दिले



नाही, पण चार जिल्ह्यांतून कोणालाही मंत्रिपद दिले नाही. आम्ही बाहेरच्या लोकांना पक्षात प्रवेश देत आहोत. त्याचा परिणाम नक्कीच मतदारांवर झाला. चंद्रपुरात काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांच्या मतदारसंघात काँग्रेसने मोठे यश संपादन केले. या यशावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, चंद्रपूर मे टायगर अभी जिंदा है.

# महाराष्ट्रातील डाळिंब थेट समुद्रमार्गे अमेरिकेला रवाना



■ मुंबई

**डाळिंब** हंगामातील महाराष्ट्रात उत्पादित झालेल्या डाळिंबाचा पहिला कंटेनर कंटेनर मुंबईच्या जेएनपीटी बंदरातून समुद्रमार्गे अमेरिकेसाठी नुकताच रवाना करण्यात आला. कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकिरण सुविधा केंद्रावरून हा कंटेनर रवाना करण्यात आला असून, राज्यातील फळनिर्यातीच्या दृष्टीने हा एक महत्त्वाचा टप्पा आहे, अशी माहिती पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले की, महाराष्ट्रात उत्पादित होणारी फळे, भाजीपाला आणि इतर शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक दर मिळण्यासाठी जागतिक स्पर्धेत टिकेल अशी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. आंबे, डाळिंब इतर फळे व भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक मूल्य मिळावे, यासाठी राज्य शासन, कृषी पणन मंडळ आणि केंद्र शासन प्रयत्नशील आहे. अमेरिकेसाठी जेएनपीटी बंदरातून हंगामातील पहिला डाळिंब कंटेनर रवाना होणे हे राज्याच्या कृषी निर्यात क्षमतेसाठी तसेच शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

# अंधेरीत गॅस गळतीमुळे आग! ३ जण जखमी

■ मुंबई

**अंधेरी** पूर्वेतील मरोळ रमाबाई आंबेडकर विजय नगर परिसरात आज पहाटे गॅस गळतीमुळे आग लागल्याची घटना घडली. या आगीत तीन जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. रमाबाई नगर येथील झोपडपट्टी परिसरातील एका घरात पहाटे साडेपाचच्या सुमारास ही दुर्घटना घडली. संबंधित घरात एलपीजी सिलिंडरमधून गॅस गळती होत होती. घरातील सदस्य झोपेत असताना गॅस संपूर्ण घरात पसरला होता. पहाटे उठल्यानंतर घरातील लाईट सुरू करताच ठिणगी पडली आणि क्षणार्धात स्फोट होऊन आग लागली. आगीच्या झळा इतक्या तीव्र होत्या की, घरातील तीन जण गंभीररित्या होरपळले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान आणि एमआयडीसी पोलीस तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी तत्परतेने आग आटोक्यात आणत परिस्थिती नियंत्रणात आणली.

### मुंबईतील 'सनबर्न फेस्टिव्हल'

# मद्यविक्रीला अनुमती देण्याच्या निर्णयाचा फेरविचार करावा!

■ मुंबई

**मुंबईतील** 'सनबर्न फेस्टिव्हल' मध्ये मद्य विक्रीस परवानगी देण्याच्या निर्णयाचा राज्य सरकारने फेरविचार करावा, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले. केवळ २०० पोलीस हजारो मद्यधुंद लोकांना कसे हाताळू शकतील? असा सवाल उपस्थित करत राज्य सरकारच्या धोरणात्मक निर्णयावर शंका व्यक्त केली. यावेळी न्यायालयाने मद्य विक्रीला किंवा सनबर्न फेस्टिव्हलच्या आयोजनास कोणतीही स्थगिती न देता सुनावणी तहकूब केली.

मुंबईत पहिल्यांदाच होणाऱ्या 'सनबर्न फेस्टिव्हल'चं आयोजन १९ डिसेंबर ते २१

### मुंबई हायकोर्टाने दिले राज्य सरकारला आदेश

डिसेंबरदरम्यान शिवडी येथील इन्फिनिटी बे, टिंबर पाँड प्लॉटजवळ अटल सेतूच्या खाली करण्यात आले आहे. या म्युझिकल फेस्टिव्हलमध्ये मोठ्या प्रमाणावर दारू विक्री देखील केली जाणार आहे. यामुळे सुरक्षेबाबत चिंता व्यक्त करत मुंबईतील रहिवासी चिंतामणी सारंग यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर काल मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी घेण्यात आली. यावेळी मुख्य न्यायमूर्तींनी स्पष्ट केले की, आम्ही याचिका प्रलंबित ठेवत आहोत. प्रशासनासाठी हीच संधी आहे.

# पाचवीतील मुलीने बनवली बिबट्याला रोखणारी 'काठी'

■ अहिल्यानगर



**कर्जत** तालुक्यातील एका पाचवीच्या विद्यार्थिनीने 'बिबट काठी' नावाचे एक अनोखे उपकरण तयार केले आहे. हे उपकरण बिबट्याला रोखण्यासाठी किंवा त्याला पळवून लावण्यासाठी उपयोगी पडणार आहे.

कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या आराध्या आशिष निंबोरे या पाचवीच्या विद्यार्थिनीने ही भन्नाट कल्पना शोधून काढली आहे. राशीन येथे आयोजित तालुका विज्ञान प्रदर्शनात तिने हे उपकरण सादर केले. तिचे शिक्षक नवनाथ धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तिने ही 'बिबट काठी' तयार केली असून, विज्ञान प्रदर्शनात या उपकरणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या काठीला अशी काही बटणे आहेत की ही बटणे दाबल्यावर काठीतून प्रखर प्रकाश, मोठा ध्वनी, गाणी वाजविण्यासाठी ब्ल्यूटूथ आणि उग्र वास बाहेर

### सोशल मीडियावर कौतुकांचा वर्षाव

येतो. त्यामुळे माणसाकडे येणारा बिबट्या घाबरून तिथून पळून जातो. या शोधाबद्दल आमदार रोहित पवार यांनी या विद्यार्थिनीचे सोशल मीडियावर कौतुक केले आहे.

# भिवंडीत रस्ता रुंदीकरणाला स्थानिक रहिवाशांचा विरोध

■ भिवंडी

**भिवंडी** शहरातील मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पालिका प्रशासनाने हाती घेतले आहे. मात्र शहरातील कल्याण नाका ते टेमघर दरम्यानच्या रस्ता रुंदीकरण कामाला स्थानिक रहिवाशांनी प्रखर विरोध केला आहे. दरम्यान, या विरोधामुळे प्रशासनाने पहाटे चार वाजता १०० पोलिसांच्या बंदोबस्तात रस्ता मोजमाप काम उरकून टाकले.

पहाटे या ३६ मीटरच्या रस्त्याचे मोजमाप करून निशाणी केली जात असल्याचे समजताच संघर्ष समितीचे पदाधिकारी शादाब उस्मानी, राम लहारे आणि दीन मोहम्मद यांच्यासह माजी आमदार रुपेश म्हात्रे यांनी कल्याण नाका परिसरात एकत्र आले. यावेळी त्यांनी पालिका कर्मचारी, अधिकारी यांना जाब विचारण्यास सुरुवात केली.

सहाय्यक पोलीस आयुक्त विजय मराठे हे अधिकारी व पोलिसांसह घटनास्थळी धावून येत त्यांनी परिस्थिती शांत केली. तोपर्यंत या रस्त्यावरील बहुतांश मोजमाप व मार्किंग पूर्ण झाले होते. सकाळी चार वाजता नागरिक झोपले असताना पालिका जागी झाली आहे.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ओबामा आणि पसायदानातील विश्वधर्म

भारतापेक्षा परदेशात कुठली काही घटना घडली तर त्याविषयीचे आकर्षण आणि चर्चा अधिक होत राहते. किंबहुना भारतासंदर्भातल्या कोणत्याही वैशिष्ट्यपूर्ण घटना परदेशात घडल्या तर त्याच्याविषयी अनुकरणही तेवढ्याच वेगाने केले जाते. परंतु या अनुकरणामध्येसुद्धा बराच मोठा फरक असतो. खरे तर आपल्या देशातल्या अनेक गोष्टी अशा आहेत की, ज्या जगातल्या अनेक देशांना भुरळ घालतात. भारताविषयी जाणून घेण्याची उत्कंठा जिज्ञासा वाढवतात. चित्रपट, फॅशन अशा अनाठायी सवंगतेपेक्षाही खरोखरच अनुकरणीय असलेल्या गोष्टी भारताकडे मोठ्या प्रमाणात आहेत. त्या ज्या पद्धतीने आणि ज्या वेगाने जगभरात पोहोचवायला हव्यात तशा त्या पोहोचवल्या गेल्या नाहीत. परंतु अनेक अभ्यासक किंवा ज्यांना वैश्विक बाजारपेठांची कल्पना आहे, अशांनी भारतातील बऱ्याच गोष्टींचा वापर करून त्या आपल्या नावावर खपवल्याचेही पाहायला मिळते. एकेकाळी विश्वगुरू असलेला भारत आता पुन्हा या सगळ्या सांस्कृतिक आणि ज्ञान विज्ञान संपत्तीवर विश्वगुरू होऊ शकतो. फक्त ही ज्ञानसंपत्ती योग्य पद्धतीने सर्वदूर पोहोचवण्याचे नियोजन करता आले पाहिजे. भारताचे वेद, उपनिषदं ही अजूनही जगातल्या अनेक अभ्यासकांवरही ओढ निर्माण करतात. राष्ट्रपुरुषांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, अशांविषयीसुद्धा जगाला आकर्षण आहे. देशभरातील अनेक संतांविषयीसुद्धा जगात कुठे ना कुठे अभ्यास सुरू असतो. भारताच्या या सांस्कृतिक सभ्यतेचे महत्त्व अधोरेखित करणारा अलिकडचा प्रकार म्हणजे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी २०२५ या वर्षात त्यांना आवडलेली पुस्तकं, गाणी, चित्रपट अशांची यादी प्रसिद्ध केली. गाण्यांच्या यादीमध्ये त्यांना ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान आवडल्याचा उल्लेख केलेला आहे. जगातल्या सर्वात मोठ्या राष्ट्राचा माजी राष्ट्राध्यक्ष त्यांना आवडलेल्या पुस्तकांच्या आणि गाण्यांच्या यादीत पसायदानाला पसंती देतो. याचा अर्थ पसायदानातून त्याला मनःशांती आणि विश्वशांती अनुभवायला आली असण्याची शक्यता आहे.

### माऊलींचा विश्वशांतीचा संदेश

आता भारतीयांना पसायदानाचे महत्त्व आणखी विशेष जाणवू लागेल. कारण अमेरिकेविषयी भारतीयांच्या मनात प्रचंड आकर्षण आहे. तिथली व्यवस्था आणि प्रशासन किंवा एकूणच जीवनमानाचा दर्जा भारतीयांना नेहमीच आकर्षित करणारा राहिला आहे. म्हणून आजही भारतातून अमेरिकेत जाणाऱ्यांची संख्या सर्वाधिक असते. शिक्षणासाठी, रोजगारासाठी, एवढेच नव्हे तर ग्रीन कार्ड मिळवून अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारून लाखो भारतीय तिथे स्थायिक झाले आहेत. त्यात महाराष्ट्रातल्या मराठी माणसांची संख्या लक्षणीय स्वरूपाची आहे. बराक ओबामा यांनी यापूर्वीसुद्धा महात्मा गांधींच्या विचारांविषयी सर्वाधिक आदर व्यक्त केला होता. जगातल्या अराजकतेवर नियंत्रण मिळवायचे असेल तर महात्मा गांधींचा अहिंसेचा मार्ग हा अधिक महत्त्वपूर्ण ठरतो. असहकारासारखा आंदोलनाचा आगळावेगळा प्रयोग हा हक्क आणि अधिकारांचे वेगाने संवर्धन करणारा ठरतो. अशा प्रकारचा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला होता. प्रामुख्याने मनःशांतीबरोबरच सामाजिक आणि वैश्विक शांतता ही जगाची सर्वात मोठी गरज आहे. त्याची पूर्तता करण्याकरीता तितक्याच मोठ्या वैचारिक आंदोलनाची गरज भासते. ओबामा यांना याच विश्वशांतीसाठी पसायदानातला विश्वशांतीचा मंत्र भारताबरोबरचे मैत्र निर्माण करणारा वाटला असावा. 'खळांटी व्यंकटी सांडो, तया सत्कर्मी रती वाढो, भूता परस्परे जडो मैत्र जीवांचे।' दुष्टांची बुद्धी सत्संगतीतून सुधारता येऊ शकते, हा माऊलींचा आत्मविश्वास विश्वशांतीचा ध्यास ठरू शकतो. सगळ्यांनाच सुखी व्हायचे असेल तर या विश्वाची निर्मिती करणाऱ्या आदिपुरूषाला शरण जाण्याचा माऊलींचा सल्ला हा मनःशांतीचा प्रभावी उपाय ठरतो. ओबामांचे मैत्र भारताचे आणि औचित्य पसायदानाचे असा हा नवा योग म्हणता येईल. भारताकडे असलेली ही ज्ञानसंपत्ती जगाच्या कल्याणाचाच विचार करणारी आहे ज्याला माऊलींनी 'विश्वस्वधर्मे सूर्ये पाहो' असे म्हटले आहे. आणि आता या विश्वातल्या सर्वात बलाढ्य राष्ट्राच्या माजी राष्ट्राध्यक्षाला पसायदानातली ही वैचारिक बलाढ्यता आकर्षित करणारी ठरली आहे. ओबामांना पसायदान आवडले. म्हणून आता ते भारतभर आणि विशेषतः महाराष्ट्रातही आवर्जून चर्चेत येईल.

### भारतीयांनाच माहिती नाही

यातला विरोधाभास असा आहे की, आज महाराष्ट्रातला लाखोंचा समाज अमेरिकेत राहतो. अमेरिकेत जाऊन नाट्यसंमेलनं, जागतिक संमेलन उभारण्याचे उपद्व्याप होत असतात. परंतु त्यात किती मराठी अभिजनांना पसायदान मुखोद्गत आहे याबद्दल प्रश्नच पडत असतो. 'अमताते पैजा जिंके किंवा माझ्या मराठीचे बोल कौतुके' असा अभिमानाने उल्लेख केलेल्या माऊलींच्या ज्ञानेश्वरीची पारायणं किती मराठी माणसं करतात. वारकरी संप्रदाय सोडला तर जे साहित्य क्षेत्रातल्या किती मुखंडांना ज्ञानेश्वरीचे आणि पसायदानाचे आकर्षण असते या सर्वांबाबत नकारात्मक उत्तरं मिळतात. आता ओबामांना पसायदान आवडत असल्याचे कळल्यानंतर महाराष्ट्रातल्या तथाकथित बुद्धीवंतांची बुद्धी जागी होऊ शकते. अमेरिकेकडे नियमित डोळे लावून बसणाऱ्यांचे भारताविषयीचे डोळे उघडले जाऊ शकतात. याप्रमाणे योगासनांचा प्रकार पाश्चात्य देशात लोकप्रिय झाला आणि नंतर भारतीयांना त्याचे महत्त्व जाणवू लागले. तसाच काहीसा प्रकार आता पसायदानाचा होऊ शकेल. म्हणूनच हे पुन्हा पुन्हा अभिमानाने सांगण्याची वेळ येते की भारत किंवा महाराष्ट्रात संत किंवा आध्यात्मिक साहित्याचे खूप मोठे भांडार दडलेले आहे. त्याकडे अपेक्षेप्रमाणे लक्ष दिले गेलेले नाही. पुण्याच्या तथाकथित पुस्तक प्रदर्शनातही राजकीय प्रदर्शनाचेच देखावे पाहायला मिळतात. कदाचित आता ओबामांच्या पसायदानाच्या पसंतीवरून पुस्तक प्रदर्शनाच्या ठिकाणी पसायदानाचे कटआऊटही लावले जाऊ शकतील. परदेशी गमन करणाऱ्यांनी स्वतःमधलं जग जाणून घेणाऱ्यांनी पसायदानातला हा वैश्विक धर्म अभ्यासणे अधिक महत्त्वाचे ठरते. आपल्याकडची ही आध्यात्मिक प्रासादिकता जगाला प्रसन्न करणारी आहे यात काही शंका नाही.

## सुविचार


**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

या जगात सुंदर किंवा अप्रतिम असं काहीच नसतं.
आपली नजर जे स्वीकारते, तेच सर्वांगसुंदर असते.

## पंचांग

**सोमवार, २२ डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**

* पौष शुक्ल द्वितीया
* नक्षत्र : उत्तराषाढा



-: जन्मराशी :-
००-०१ ते १०-०६ धनु
१०-०७ ते २४-०० मकर

रवी उदय- ०७-०९
रवी अस्त- १८-०६

**संक्रमण पुण्यकाळ सूर्योदय ते सूर्यास्त; मुस्लीम रज्जब मासारंभ; श्री नृसिंह सरस्वती जयंती; राष्ट्रीय गणित दिन**

## पाककृती




### क्रिस्पी उडीद वडा



★ **साहित्य :-**
एक वाटी उडीद डाळ थोडीशी मूग डाळ एक कांदा, दोन मिरच्या, थोडे जिरे, एक डहाळी कडीपत्ता

★ **कृती:-** रात्री उडीद व मूग डाळ एकत्र भिजत घालणे, सकाळी कमी पाण्यात सरबरीत वाटून घेणे. वाटून झाल्यावर चमच्याने चांगले फेसून घेणे, म्हणजे वाटलेली डाळ हलकी होते.



चवीपुरतं मीठ, जिरे, कडीपत्ता चिरुन, मिरच्या बारीक चिरून व एक कांदा बारीक चिरून घालणे.

कढईत तेल चांगले तापले की, आच मध्यम करणे, हाताने किंवा चमच्याने गोल वडे टाकणे.

दोन्हीकडून खरपूस तळले गेले की बाहेर काढणे.

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)



## आशिया अंडर-१९ क्रिकेट चषक

# भारताला नमवून पाकिस्तानने जिंकला

**सलामीवीर समीर मिन्हास यांच्या १७२ धावांच्या वादळी खेळीच्या जोरावर पाकिस्तानने भारताला १९१ धावांनी पराभूत करत दुसऱ्यादा आशिया अंडर-१९ क्रिकेट चषक जिंकला. दुबईत झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पहिली फलंदाजी करताना पाकिस्तानने भारताला विजयासाठी ३४८ धावांचे मोठे आव्हान दिले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना पाकिस्तानी गोलंदाजांसमोर भारतीय फलंदाजांनी सपशेल नांगी टाकली. त्यामुळे भारताचा संपूर्ण संघ २६.१ षटकांत १५६ धावांवर गारद झाला. समीर मिन्हासला सामनावीर आणि मालिकावीर म्हणून घोषित केले.**



■ दुबई

**भारताने** नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पाकिस्तानने हमजा झहूरच्या रुपात पहिली विकेट ३१ धावांवर गमावल्यानंतर समीर मिन्हासने भारतीय गोलंदाजांना धु-धु धुतले आणि त्याने चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला. त्याला उस्मान खान (३५)आणि अहमद हुसेन (५६) यांनी चांगली साथ दिली. समीरने ९० चेंडूंत शतक पूर्ण केले. उस्मान खान आणि अहमद हुसेन हे दोघे बाद झाल्यानंतर पाकिस्तानची स्थिती ३७.३ षटकांत ३ बाद २६० धावा अशी झाली होती. त्यानंतर एका बाजूने विकेट जात असताना समीरने आपली धावगती कमी केली नाही. त्याने १०५ चेंडूंत १५० धावा पूर्ण केल्या. शेवटी तो ११३ चेंडूंत ९ षटकार आणि ७ चौकारांसह १७२ धावा करून बाद झाला. तोपर्यंत पाकिस्तानने ३००चा आकडा पार केला होता. निकाब शफीक (१२) आणि मोहम्मद सय्यम (१३) यांनी शेवटी नाबाद राहून संघाची धावसंख्या ८ बाद ३४७ वर पोहोचवली. या धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय संघाच्या कोणत्याही फलंदाजाला ४० धावा करता आल्या नाहीत. दीपेश देवेंद्रनला ३६ आणि वैभव सूर्यवंशीला २६ धावा करता आल्या. त्यामुळे पाकिस्तानने भारतावर १९१ धावांनी सहज विजय मिळवत या स्पर्धेच्या चषकावर आपले नाव कोरले.

## जिम्नॅस्टिक्स टॅलेंट डिस्प्ले स्पर्धा १७ जानेवारीला वडाळ्यात रंगणार

■ मुंबई

**वडाळा** येथील भारतीय क्रीडा मंदिरात मुंबई सिटी डिस्ट्रिक्ट जिम्नॅस्टिक्स असोसिएशनतर्फे मुंबई, ठाणे, रायगड जिल्ह्यात जिम्नॅस्टिक्स खेळाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी प्रतिवर्षी प्रमाणे यंदा देखील १८ व्या जिम्नॅस्टिक्स मिनी स्टेट टॅलेंट डिस्प्ले स्पर्धेचे १७ जानेवारी रोजी आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी जास्ती जास्त खेळाडूंना आपली नोंदणी करता यावी म्हणून प्रशिक्षकांच्या विनंतीनुसार ऑनलाईन प्रवेशिका स्वीकारणे सुरू आहे. यामध्ये मुला-मुलींसाठी ८, १०, १२, १४, १६ वर्षांखालील आणि १६ वर्षांवरील असे वयोगट आहेत. फक्त फ्लोअर एक्झरसाईझेवर प्रत्येक खेळाडूला कोणतेही १० प्रकार सादर करायचे आहेत. यामुळे नवोदित खेळाडूंना स्पर्धेत भाग घेण्याची संधी मिळणार आहे.

## अ‍ॅशेसमध्ये ऑस्ट्रेलियाची विजयी आघाडी मालिकेत इंग्लंडचा सलग तिसरा पराभव

■ ॲडलेड

**ॲडलेड** येथे झालेल्या ॲशेस कसोटी मालिकेतील तिसऱ्या सामन्याच्या पाचव्या दिवशी आज ऑस्ट्रेलियाने इंग्लंडला ८२ धावांनी पराभूत करून या मालिकेत ३-० विजयी आघाडी घेतली. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडला विजयासाठी ४३५ धावांचे आव्हान दिले होते. या प्रत्युत्तरात इंग्लंडचा दुसरा डाव ३५२ धावांवर आटोपल्याने मालिकेत सलग तिसरा पराभव पत्करावा लागला. ऑस्ट्रेलियाचा ॲलेक्स कॅरीला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. त्याने या कसोटीत पहिल्या डावात १०६ , दुसऱ्या डावात ७२ धावांसह ६ झेल घेतल्या.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३७१ धावा केल्या होत्या. त्यानंतर इंग्लंडला २८६ धावा करता आल्यामुळे ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ८५ धावांची आघाडी घेतली होती. या आघाडीनंतर ऑस्ट्रेलियाने दुसरा डाव ३४९ धावांवर संपला. परिणामी इंग्लंडला विजयासाठी ४३५ धावांचे लक्ष्य मिळाले. काल कसोटीच्या चौथ्या दिवसअखेर इंग्लंडने ६ बाद २०७ धावा केल्या होत्या. काल नाबाद राहून तंबूत परतलेले जेमी स्मिथ आणि विल जॅक्स यांनी आज सातव्या विकेटसाठी ९१ धावांची भागिदारी केली. त्यानंतर ही जोडी मिचेल स्टार्कने फोडली. स्मिथ ६० धावा करून बाद झाला. जॅक्स ४७ धावा करून माघारी परतला. त्यालाही मिचेल स्टार्कने बाद केले. आर्चर (३)आणि जोश टॅग (१) अनुक्रमे नवव्या आणि दहाव्या विकेटच्या रुपात बाद झाले. ब्रायडन कार्सेने नाबाद ३९ धावा केल्या. त्यामुळे इंग्लंडला ३५२ धावांपर्यंत मजल मारता आली.

## भारतीय महिला संघाचा श्रीलंकेवर विजय

■ विशाखापट्टणम

**विशाखापट्टणममध्ये** आज श्रीलंका महिला संघाविरुद्ध झालेल्या पाच टी-२० मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय महिला संघाने ८ विकेट व ३२ चेंडू शिल्लक राखून विजय मिळवला. श्रीलंकेने भारताला विजयासाठी १२२ धावांचे आव्हान दिले होते. ते भारताने २ गडी गमावून १४.४ षटकांत सहज गाठल्याने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

श्रीलंकेकडून विश्मी गुणरत्नेने ३९, चामरी अथापथ्थुने १५, हसिनी परेराने २०, हर्षिता समरविक्रमने २१ धावा केल्या. त्यामुळे श्रीलंकेला ६ बाद १२१ धावांपर्यंत मजल मारता आली. या धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय सलामीवीर शफाली वर्मा ९ धावा करून बाद झाली. त्यानंतर स्मृती मंधाना आणि जेमिमा रॉड्रिग्ज यांची जोडी जमली. संघाची धावसंख्या ८ षटकांत १ बाद ६६ पोहोचताच स्मृती मंधाना



२५ चेंडूंत २५ धावा करून बाद झाली. शेवटी जेमिमा रॉड्रिग्ज ४४ चेंडूंत ६९ धावा आणि कर्णधार हरमनप्रीत कौर १६ चेंडूंत १५ धावा करून नाबाद राहिली, त्यांच्या खेळीच्या जोरावर भारताने १४.४ षटकांत २ बाद १२२ धावा केल्या आणि मालिकेतील पहिला विजय साजरा केला.

## न्यूझीलंडविरुद्ध वेस्ट इंडिजला विजयासाठी ४१९ धावांची गरज

**माउंट मौंगानुई-** माउंट मौंगानुईमध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या ३ कसोटी मालिकेतील तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यात सलामीवीर टॉम लॅथम आणि डेव्हॉन कॉनवे यांनी दुसऱ्या डावातही चमकदार कामगिरी केल्यामुळे न्यूझीलंडचा संघ भक्कम स्थितीत आहे. आज न्यूझीलंडने दुसरा डाव २ बाद ३०६ धावांवर घोषित केला. त्यामुळे वेस्ट इंडिजला ४६३ धावांचे विजयी लक्ष्य मिळाले.

या धावसंख्येचा पाठलाग करताना आज दिवसअखेर वेस्ट इंडियने बिनबाद ४३ धावा केल्या. उद्या पाचव्या दिवशी वेस्ट इंडिजला विजयासाठी अजूनही ४१९ धावांची गरज आहे. न्यूझीलंडने पहिल्या डावात ८ बाद ५७५ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात वेस्ट इंडिज संघाने ४२० धावा केल्यामुळे न्यूझीलंडने पहिल्या डावात १५५ धावांची आघाडी घेतली.

## बापट ढाल क्रिकेट स्पर्धा स्पोर्ट्स फिल्डला विजेतेपद

■ मुंबई

**स्पोर्ट्स** फिल्ड क्रिकेट क्लबने युनायटेड क्रिकेट क्लब असोसिएशनचा ६ विकेट आणि ३ षटके राखून पराभव करत कुर्ला स्पोर्ट्स क्लब आयोजित बाळकृष्ण बापट ढाल टी -२०क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात युनायटेड क्रिकेट क्लबने दिलेले १३३ धावांचे आव्हान स्पोर्ट्स फिल्डने १७ षटकात १३४ धावा करून पूर्ण केले. स्पोर्ट्स फिल्डचा केतन जोशीला सामनावीर म्हणून घोषित केले. प्रथम फलंदाजी करताना युनायटेडच्या प्रतीक गोतसुर्वेची ४५ धावांची खेळी संघासाठी महत्त्वपूर्ण ठरली. या डावात शुभम पाठकने ४, केतन जोशी आणि रोहिल जाधवने प्रत्येकी ३ फलंदाज बाद केले.

## श्री साई क्लब, आदर्श मंडळ, भवानीमाता, माऊली संघांनी उपांत्य फेरी गाठली

■ मुंबई

**श्री** साई क्लब, आदर्श मंडळ, भवानीमाता, माऊली स्पोर्ट्स यांनी आगरी सेवा संघाच्या कबड्डी स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. प्रभादेवी येथील राजाराम साळवी उद्यानातील स्व. दि. बा. पाटील क्रीडानगरीत आजच्या तिसऱ्या दिवशी श्री साई क्लबने हिंद केसरी मंडळावर ३८-२५ अशी मात करीत उपांत्य फेरी गाठली. अनिकेत घाडगेच्या चतुरस्त्र खेळाच्या जोरावर पूर्वार्धात २ लोण देत साई क्लबने २२-०६ अशी मजबूत आघाडी घेतली. उत्तरार्धात मात्र हिंद केसरीच्या प्रसाद काटकरने जोरदार प्रतिकार करत सामना रंगतदार स्थितीत नेला. पण संघाला विजया सामीप नेण्यास तो कमी पडला. दुसऱ्या सामन्यात सागर काष्टे याच्या भन्नाट खेळमुळे माऊली स्पोर्ट्स क्लबने सूर्यकांत मंडळाचा ३८-१४ असा एकतर्फी पराभव केला. माऊलीने पहिल्या डावात २ लोण देत आपला विजय निश्चित केला. दुसऱ्या डावात सावध खेळ करीत त्यावर शिक्कामोर्तब केले. सूर्यकांतचा निखिल माळकर चमकला. आदर्श मंडळाने श्री गणेश मंडळावर ३९-१९ अशी मात केली.


## अंतिम फेरीत महिलांमध्ये धाराशिव-पुणे, पुरुषांमध्ये पुणे-मुंबई उपनगर भिडणार

■ बीड

**बीड** येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत अंतिम फेरीचे चित्र स्पष्ट झाले असून महिला गटात धाराशिव-पुणे तर पुरुषांमध्ये पुणे-मुंबई उपनगर यांच्यात विजेतेपदासाठी लढत रंगणार आहे. चारही संघांमध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा भरणा असल्याने हे अंतिम सामने कमालीचे चुरशीचे होण्याची अपेक्षा आहे.

महिला गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात धाराशिवने नाशिकचा एक डाव व १० गुणांनी (२६-१६) धुव्वा उडवत रुबाबात अंतिम फेरी गाठली. धाराशिवकडून संध्या सुरवसे (३.१० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (२.३० मि. संरक्षण व ४ गुण), मैथिली पवार (२ मि. संरक्षण व २ गुण) यांनी संघाच्या विजयात धमाकेदार खेळी करत उल्लेखनीय मोठा विजय साजरा करत प्रेक्षकांना जागेवर खिळवून ठेवले. तर पराभूत नाशिककडून ज्योती मेढेने चांगली कामगिरी केली.

महिला गटातील दुसऱ्या उपांत्य सामन्यात पुण्याने ठाण्याचा ३ गुण व ५० सेकंद राखून (३२-२९) निसटता पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दोन्ही डावांत ड्रीम रनच्या जोरावर पुण्याने ४ गुण मिळवत आघाडी घेतली, तर ठाण्याला केवळ १ ड्रीम रन



गुणावर समाधान मानावे लागले. पुण्याकडून श्वेता नवले (२.२४ मि. संरक्षण), प्रियांका इंगळे (१.३० व २.०४ मि. संरक्षण व १० गुण), श्वेता वाघ (१.१४ मि. संरक्षण व ४ गुण), अपर्णा वर्धे (नाबाद १.३० व १.१६ मि. संरक्षण व २ गुण) यांनी निर्णायक खेळी करताना अंतिम फेरीची दारे उघडली तर पराभूत ठाण्याकडून रेश्मा राठोड (२.२० व १.३२ मि. संरक्षण व ४ गुण), प्रियांका भोपी (१.२० व १.०३ मि. संरक्षण) यांनी झुंजार खेळ करताना विजयाची पराकाष्टा केली. मात्र त्या अपयशी ठरल्या.

# चोरीच्या संशयावरून मारहाण छत्तीसगडच्या मजुराचा मृत्यू

■ सक्ती

**केरळमध्ये** छत्तीसगडमधील स्थलांतरित मजूर राम नारायण बघेल बांगलादेशी समजून जमावाने मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात मजुराचा मृत्यू झाला. शवविच्छेदन अहवालात मृताच्या शरीरावर ८० हून अधिक जखमा आढळून आल्या आहेत. या प्रकरणी पलक्कड जिल्ह्यातील वालैयार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



राम बघेल हे छत्तीसगडच्या सक्ती जिल्ह्यातील करही गावाचे रहिवासी होते. कामासाठी ते अवघ्या एका आठवड्यापूर्वी केरळमधील पलक्कड जिल्ह्यात आले होते. १७ डिसेंबर रोजी अट्टापल्लम परिसरात स्थानिक नागरिकांनी राम यांना चोरीच्या संशयावरून पकडले. कोणताही ठोस पुरावा नसतानाही जमावाने त्यांना मारहाण केली.

# गंगा घाटावर थुंकणाऱ्यांकडून थेट ५०० रुपये दंड वसूल

**वाराणसी-** वाराणसी महापालिकेने स्वच्छतेच्या बाबतीत कठोर पाऊल उचलले. पालिका आयुक्त हिमांशु नागपाल यांनी वाराणसीतील अस्सी घाट ते मणिकर्णिका घाटापर्यंत पायी फिरून पाहणी केली. हरिश्चंद्र घाटावर तरुणाला थुंकताना पकडले आणि त्याच्याकडून जागीच ५०० रुपये दंड वसूल केला.

या पाहणीत घाटाच्या भिंतीवर जिथे पान-मसाल्याचे डाग आहेत, तिथे तातडीने स्वच्छता करून 'वॉल पेंटिंग' करण्याचे आदेश पालिका आयुक्त हिमांशू नागपाल यांनी दिले. आता अंतिम संस्कारासाठी येणाऱ्या लोकांची फसवणूक टाळण्यासाठी मणिकर्णिका घाटावरील दुकानदारांसाठी प्रशासनाने नवे नियम जारी केले आहेत.

देश विदेश

# रशिया-युक्रेन युद्धबंदीबाबत फ्लोरिडात बैठकीचे सत्र सुरू

■ वॉशिंग्टन

**युक्रेनमधील** युद्धबंदीबाबत चर्चा करण्यासाठी रशिया आणि अमेरिकेच्या शिष्टमंडळामध्ये पुन्हा फ्लोरिडामध्ये बैठकीचे सत्र सुरू झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून आपल्या प्रस्तावाचा अजूनही पाठपुरावा केला जात आहे.

अमेरिकेच्या प्रतिनिधींनी युक्रेन आणि युरोपीय संघाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्या चर्चेतून काही ठोस तोडगा निघण्याची आशा निर्माण झाली होती. फ्लोरिडामध्ये होत असलेल्या चर्चेमध्ये किरील दिमित्रेव हे अध्यक्ष पुतीन यांचे विशेष दूत म्हणून सहभागी झाले आहेत.तर अमेरिकेकडून ट्रम्प यांचे विशेष दूत म्हणून स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ हे चर्चा करतील. याशिवाय ट्रम्प प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार देखील चर्चेमध्ये सहभागी होणार आहेत. अमेरिका आणि रशियाच्या शिष्टमंडळामध्ये यापूर्वीची



चर्चा मियामीमधील विटकॉफ यांच्या हलांदेल बीच येथील येथील गोल्फ क्लबवर झाली होती. शांतता प्रस्तावाबाबत युक्रेन, अमेरिका आणि युरोपीय संघाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये झालेली चर्चा सकारात्मक होती. युद्ध थांबवण्याचा पर्याय म्हणून युक्रेनला सुरक्षेची हमी देण्याबाबत तिन्ही बाजूंच्या प्रतिनिधींमध्ये एकमत झाले होते. अद्याप युक्रेन आणि रशियाच्या प्रतिनिधींमध्ये थेट चर्चा झालेली नाही, अशी थेट चर्चा होण्याची शक्यता रशियाच्या प्रतिनिधींनी फेटाळून लावली.

# पैसे देण्यास विलंब म्हणून जमीन व्यवहार रद्द होत नाही

■ दिल्ली

**जमीन** खरेदी व्यवहारात मुदतीपेक्षा पैसे भरण्यास थोडा उशीर झाला, तरी तो व्यवहार किंवा कोर्टाचा आदेश रद्द ठरवता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. मात्र, यात खरेदीदाराची करारातील आपली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी सतत तयारी असल्याचे दिसणे आवश्यक आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

एका व्यक्तीने २००४ मध्ये ९.०५ लाख रुपयांना भूखंडाचा व्यवहार केला. मात्र खरेदी करणारा आणि विक्री करणाऱ्यामध्ये वाद झाला. हे प्रकरण कनिष्ठ न्यायालयात दाखल झाले. २०११ मध्ये कनिष्ठ न्यायालयाने खरेदीदाराच्या बाजूने निकाल दिला. दोन

**सर्वोच्च न्यायालयाचा निकाल**

महिन्यांत उर्वरित रक्कम भरून खरेदीखत करून घेण्याचे आदेश दिले. यानंतर जमीन मालकाने या निर्णयास उच्च न्यायालयात आव्हान दिले. २०१६ मध्ये उच्च न्यायालयाने खरेदीदाराचा हक्क मान्य केला; पण पैसे भरण्यासाठी कोणतीही नवीन मुदत दिली नाही. उच्च न्यायालयाच्या निकालानंतर खरेदीदाराने पैसे भरण्यास काही दिवसांचा विलंब केला. या विलंबाचे कारण देत जमीन मालकाने पुन्हा उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयानेही पैसे भरण्यास विलंब केल्याचे स्पष्ट करत हा जमीन व्यवहार होऊ शकत नाही, असा आदेश उच्च न्यायालयाने दिला. या आदेशाविरोधात जमीन खरेदीदाराने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. यावर न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती संजय करोल यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या मुदतीत रक्कम न भरणे म्हणजे कराराचा त्याग करणे किंवा तो रद्द करणे असा होत नाही.

# बांगलादेशमध्ये घराला आग ७ वर्षीय मुलीचा जळून मृत्यू

■ ढाका

**बांगलादेशातील** लक्ष्मीपूर सदर भागात काल रात्री उशिरा अज्ञात उपद्रवींनी एका



घराला बाहेरून कुलूप लावून पेट्रोल टाकून आग लावल्याने ७ वर्षांच्या मुलीचा जिवंत जळून मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर भाजले आहेत. हे घर बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे स्थानिक नेते बिलाल हुसैन यांचे असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आगीत बिलाल हुसैन यांची ७ वर्षांची मुलगी आयशा अख्तर हिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर स्वतः बिलाल हुसैन आणि त्यांच्या दोन मुली सलमा अख्तर (१६) व सामिया अख्तर (१४) गंभीर भाजल्या आहेत. बिलाल हुसैन यांच्यावर लक्ष्मीपूर सदर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

# रशियाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात युक्रेनचे ओडिसा बंदर उद्ध्वस्त

■ किव्ह

रशियाने युक्रेनच्या दक्षिणेकडील ओडिसा शहरातील बंदरावर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात बंदर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. या हल्ल्यात ८ जण ठार झाले असून २७ जण जखमी झाले आहेत. युक्रेनच्या आपत्कालीन सेवेने ही माहिती दिली.

स्थानिक वृत्तपत्र टेलिग्राम पोस्टच्या वृत्तात म्हटले आहे की, हल्ला झाला तेव्हा बंदराच्या जवळून जात असलेल्या एका बसमधील काही प्रवासीदेखील जखमी झाले. त्याचबरोबर पार्किंग लॉटमध्ये उभ्या असलेल्या एका ट्रकने पेट घेतला. ही आग एवढी भडकली की, आसपासच्या काही गाड्यांनीही पेट घेतला.

# मरीन ड्राईव्ह येथील बोगदा खोदकामामुळे वारसा इमारतींना धोका! रहिवासी चिंतेत

■ मुंबई

**मुंबईच्या** मरीन ड्राईव्ह येथून ऑरेंज गेटला जोडणारा जुळा बोगदा मार्ग एमएमआरआयडीकडून प्रस्तावित आहे. मात्र या बोगदा बांधण्यासाठी हाती घेण्यात येणाऱ्या उत्खनन कामांमुळे येथील १६ वारसा (हेरिटेज) इमारतींना नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे येथील रहिवाशी चिंतेत आहेत.

मरीन ड्राईव्ह येथील या इमारतींच्या अद्वितीय वास्तुकलेसाठी २०१८ मध्ये युनेस्कोने अनेक इमारती जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केल्या आहेत. येथील भुयाराच्या खोदकामात टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) वापर आणि ब्लास्टिंगमुळे इमारतींच्या पायाला नुकसान होऊन घरात राहणाऱ्यांसाठी धोका निर्माण होईल, असे येथील रहिवासी विवेक देसाई यांचे म्हणणे आहे.

२०२२मध्ये कोस्टल रोडच्या भूमिगत बोगद्यांसाठी खोदकाम सुरू असतानादेखील अनेक रहिवाशांनी त्यांच्या घराच्या आतील भागात हादरे जाणवत असल्याची तक्रार केली होती. मूळ आराखडा कोणताही अभ्यास न करता प्रस्तावित करण्यात आला असल्याचा रहिवाशांचा आक्षेप आहे. दरम्यान, रहिवाशांची स्थानिक आमदारांसोबत एक संयुक्त बैठक घेतली घेण्यात आली. यावेळी बालभवन येथील पर्यायी जागेचा अंतिम पर्याय म्हणून विचार केला जावा, असे प्रस्तावित करण्यात आले असल्याचे भाजपाच्या माजी नगरसेविका हर्षिता नार्वेकर यांनी सांगितले.

# उल्हासनगरातील निवडणूक सूत्रे आमदार कुमार आयलानींकडे

■ उल्हासनगर

**पक्षांतर्गत** गटबाजी टाळत भाजपाने उल्हासनगर महापालिका निवडणुकीची सूत्रे अनुभवी चेहरा असलेल्या कुमार आयलानी यांच्याकडे सोपविली आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आमदार कुमार आयलानी यांची निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. या निर्णयामुळे उल्हासनगरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले असून, भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह दिसून येत आहे. या पालिकेसाठी मतदान प्रक्रिया १५ जानेवारी रोजी पार पडणार आहे. या निवडणुकीत पक्षांतर्गत ताळमेळ राखणे, उमेदवारांची निवड आणि प्रचाराची रणनीती आखण्यासाठी प्रदेश नेतृत्वाने कुमार आयलानी यांना सर्वाधिकार दिले आहेत.



# माणिकवाडीत मेंढ्यांच्या कळपावर बिबट्याचा हल्ला

■ सांगली

**वाळवा** तालुक्यातील माणिकवाडी येथे मेंढ्यांच्या कळपावर काल मध्यरात्री बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात पशुपालक संदीप महादेव गडाळे यांच्या मालकीच्या एका मेंढ्याचा मृत्यू झाला, तर तीन मेंढ्या गंभीर जखमी झाल्या.

काशिनाथ रेठरेकर यांच्या शेतात संदीप गडाळे यांच्या मेंढ्या बसवल्या होत्या. शुक्रवारी मध्यरात्री बिबट्याने मेंढ्यांच्या कळपावर हल्ला केला. त्यात एका मेंढ्याचा मृत्यू झाला, तर तीन मेंढ्या जखमी झाल्या. गडाळे हे पहाटे शेतात गेल्यावर हा प्रकार उघडकीस आला.

# इन्स्टाग्रामवर 'गुड बाय' स्टेटस! तरुणाची तापी नदीत आत्महत्या

■ धुळे

**जिल्ह्यातील** शिरपूर तालुक्यातील वाडी खुर्द येथील एका २२ वर्षांच्या तरुणाने तापी नदी पात्रात पुलावरून उडी मारून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्या मोबाईलच्या स्टेटसवर नदी सोबतचा फोटो टाकून 'गुड बाय' लिहिले होते. काल शनिवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली.




आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव उमेश राजेंद्र पाटील असे आहे. उमेश पाटील हा घरातील एकुलता एक मुलगा होता. तो नोकरीनिमित्त सुरत येथील एका कंपनीत काम करत होता. यात्रेनिमित्त दोन दिवसांपूर्वीच तो आपल्या गावी वाडी खुर्द येथे आला होता. आत्महत्येपूर्वी उमेशने इंस्टाग्रामवर 'गुड बाय' असा तापी नदीसोबतचा स्वतःचा सेल्फी फोटो स्टेटस ठेवल्याचे समोर आले आहे. त्याने आत्महत्या का केली यामागचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेने गावात शोककळा पसरली आहे.

# कॉन्ट्रॅक्टर स्ट्राँग रुममध्ये शिरला उरणमध्ये मतमोजणीपूर्वी राडा

■ उरण

**रायगडच्या** उरण नगरपरिषदेच्या मतमोजणी केंद्रावर राडा झाला. नाष्ट्याचा कॉन्ट्रॅक्टर म्हणून एक इसम स्ट्राँग रुमच्या दिशेने गेल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला. मतमोजणीला अवघे काही मिनिटे उरली असताना हा प्रकार घडल्याने मतमोजणी केंद्रावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

रायगड जिल्ह्यातील उरण नगरपरिषदेच्या मतमोजणी केंद्रावर मतमोजणीपूर्वीच गोंधळ उडाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. नाष्ट्याचा कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करणारा एक इसम थेट स्ट्राँग रुमच्या दिशेने गेल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे. मतमोजणी सुरू होण्यास अवघी काही मिनिटे बाकी असताना हा प्रकार घडल्याने केंद्रावर तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. मतमोजणी सुरू होण्यापूर्वी कोणालाही प्रवेशास परवानगी नसताना संबंधित इसम स्ट्राँग रुमपर्यंत कसा पोहोचला, असा थेट सवाल महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार भावना घाणेकर यांनी तहसीलदारांकडे केला. या घटनेमुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. त्यानंतर प्रशासनाने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

# बविआ आणि मविआत पेच समान चिन्हावर एकमत नाही


**वसई-विरार पालिका निवडणूक**

■ वसई

**वसई-** विरार महापालिकेसाठी महाविकास आघाडीने हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीसोबत निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला असला तरी आता समान चिन्हाच्या आग्रहामुळे पेच निर्माण झाला आहे.

बविआचे पारंपरिक चिन्ह शिट्टी आहे आणि त्यावरच निवडणूक लढवावी, असा बविआ अध्यक्ष ठाकूरांचा आग्रह आहे. काँग्रेस आणि उबाठा मात्र शिट्टी चिन्हावर निवडणूक लढायला तयार नाही. शिट्टी चिन्ह घेतले तर आमचा पक्ष बविआमध्ये विलिन झाला असा समज होईल. काँग्रेसचे पंजा हे राष्ट्रीय चिन्ह घ्यावे, असे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांनी सांगितले. उबाठानेही शिट्टी नको, असे मत मांडले. ज्या शिट्टीला आजवर विरोध केला त्याच चिन्हावर मते कशी मागणार, असा सवाल उबाठाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण म्हाप्रळकर यांनी केला आहे.

दुसरीकडे नवीन चिन्ह घेतले तर लोकांपर्यंत पोहोचता येणार नाही, असे बविआ अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले. समान चिन्हाच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहे. वरिष्ठ पातळीवरील नेत्यांकडून याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल असे दोन्ही पक्षांनी सांगितले.



# दक्षिण आफ्रिकेमध्ये बेछूट गोळीबारात ९ जणांचा मृत्यू

■ प्रिटोरिया

**जोहान्सबर्गजवळील** बेकर्सडाल येथे अनधिकृत दारूच्या बारमध्ये काही जणांनी बेछूट गोळीबार केला. या हल्ल्याचा उद्देश स्पष्ट झालेला नाही. गोळीबारात ९ जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत.

या महिन्यातील ही दुसरी घटना आहे. काही जणांना अज्ञात बंदूकधाऱ्यांनी रस्त्यावरच गोळीबार करून ठार मारले. हे क्षेत्र दक्षिण आफ्रिकेतील काही प्रमुख सोन्याच्या खाणींजवळील एक गरीब परिसर आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याआधी ६ डिसेंबरला राजधानी प्रिटोरियाजवळील एका वसतिगृहावर बंदूकधाऱ्यांनी हल्ला करून तीन वर्षांच्या बालकासह १२ जणांची हत्या केली होती.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**सुचना**

''महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित पालघर विभागीय कार्यालयांतर्गत बोईसर (औ) उपविभाग येथे कार्यरत असलेले श्री. मयुर राजेंद्र पाटील,, भ.नि.नि.क्र. ०२८४९८८७, पद कनिष्ठ अभियंता (कार्यालय) हे दिनांक १२.०८.२०२४ पासुन ते आज तागायत व तसेच (दिनांक ०१.०३.२०२४ पासुन ते दिनांक ११.०८.२०२४ पर्यंत सफाळे उपविभाग येथे कामावर गैरहजर होतात) विनापरवानगी गैरहजर राहीले आहेत. श्री. मयुर राजेंद्र पाटील यांना या प्रकरणी खालील नमुद केलेले सक्षम अधिकारी यांनी या प्रकरणी विभागीय चौकशी घेण्याचे ठरविलेले आहे. सदर विभागीय चौकशीचे पत्र रजीस्टर पोस्टाने रवाना (ByRPAD) व्दारा तीन पत्र वेगवेगळे पत्र क. १. काअ / पालघर / मासंवि / गोपनीय / ८८५ / २०२५ / ११६१६८ / १५४१११ दि. ३०.१०.२०२५, २. काअ / पालघर / मासंवि / गोपनीय / २३६ दि. ३१.१०.२०२५ ३. काअ/पालघर/मासंवि / गोपनीय / २९४ दि. २७.११.२०२५ नुसार असे ३ विभागीय चौकशीपत्र पत्र पाठविण्यात आले होते. परंतु श्री. मयुर राजेंद्र पाटील यांना सदर विभागीय चौकशीचे पत्र रजीस्टर पोस्टाने रवाना (ByRPAD) व्दारा पाठविलेले असुन त्यांनी दोनदा स्विकारले नसुन परत केलेले होते. त्यामुळे सदर विभागीय चौकशीचे पत्र वर्तमान पत्राव्दारे प्रसिध्द करावे लागत आहे. वर्तमान पत्राव्दारे प्रसिध्द केलेल्या विभागीय चौकशीचे पत्र प्रसिध्द होताच ३ दिवसाच्या आत पालघर विभागीय संपर्क करावा अन्यथा श्री. मयुर राजेंद्र पाटील यांना कंपनीमध्ये काम करण्यासाठी कोणता रस नाही असे समजुन ''विभागीय चौकशीची प्रक्रिया पुर्ण केली जाईल'' व त्यानुसार अंतिम शिक्षा ठोठाविण्यात येईल त्यास सर्वस्वी जवाबदार हे श्री. मयुर राजेंद्र पाटील राहतील याची नोंद घ्यावयाची आहे.

सही/-
**कार्यकारी अभियंता, तथा सक्षम अधिकारी पालघर विभाग**

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, म.रा.वि.वि.कं. मर्या., पालघर विभाग, ''विद्युत भवन'' तळ मजला, मनोर रोड, ता. जि. पालघर ४०१४०४
Email Id - eepalghar@yahoo.in / jmhrpalghardn@gmail.com Web :- www.mahadiscom.in
(M No. 9028154266 / 277)



**TENDER NOTICE**

**VASAI MANOR CHSL.**
Situated at Opp. Janki Regency, Chulna Bhabola Road, Near Javeri Complex, Vasai Road (W) - 401202

**Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.**
Tender can be collected from Consultant Office
From: **22/12/2025 to 27/12/2025**
Between 11.00 Am To 5.00 Pm
Date of Submission on
**28/12/2025 (up to 5.00 PM)**
At VASAI MANOR CHSL Society Office.
(Refer Address from above)
Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT. LTD.
Consulting Engineers
Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East) Tel. Office. 9820818155
**Tender Cost Rs. 5,000/- (Non-Refundable)**



**जाहीर सूचना**

आम्ही श्री. विजयभाई पुरुषोत्तमभाई पटेल उर्फ विजय पुरुषोत्तमभाई पटेल ज्यांचा पत्ता १५७, एंटरप्राईज अपार्टमेंट्स, फोर्जेट हिल रोड, ताडदेव, मुंबई ४०००२६ आणि (२) श्री. पुरुषोत्तमभाई नरेनभाई पटेल उर्फ पुरुषोत्तमभाई नरनभाई पटेल ज्यांचा पत्ता २१२, एंटरप्राईज अपार्टमेंट्स, फोर्जेट हिल रोड, ताडदेव, मुंबई ४०००२६, यांच्याकडून ५ (पाच) पूर्ण भरणा केलेल्या शेअर्समध्ये त्यांचे हक्क, शिर्षक आणि हितसंबंध खरेदी आणि प्राप्त करण्यासाठी वाटाघाटी करत आहोत ज्यांचे दर्शनी मूल्य रु. ५०/- (रु. पन्नास फक्त) प्रत्येकी, क्रमांक २८५६ ते २८६० (दोन्ही समाविष्ट) असलेले, १८ डिसेंबर २००० रोजीच्या भाग प्रमाणपत्र क्र.२८५६/२८६० **(सदर शेअर्स)** अंतर्गत प्रसाद चेंबर्स प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या भाग भांडवलामध्ये आणि सदर शेअर्सच्या धारणेशी संबंधित, मुंबईच्या ऑपेरा हाऊस येथे असलेल्या प्रसाद चेंबर्स म्हणून ज्ञात इमारतीच्या तळघरात सुमारे ४२३ चौरस फूट (सामान्य भिंतींच्या मध्य रेषेपासून मोजलेले कार्पेट क्षेत्र) **(सदर युनिट)** कार्यालय प्रिमायसेस क्र.जी-२/ए वापरण्याचा आणि भोगवटा करण्याचा अधिकार, जी ऑपेरा हाऊस, मुंबई ४००००४ येथे स्थित, ऑपेरा हाऊस, मुंबई ४००००४ च्या 'डी' वॉर्ड अंतर्गत गिरगाव विभागातील कॅडस्ट्रल सर्व्हे क्र.१४८७ असलेल्या जमिनीच्या भाग व खंडावर उभे आहे. सदर शेअर्स आणि सदर युनिट यांना यापुढे एकत्रितपणे **सदर प्रिमायसेस** म्हणून संदर्भित.

सदर जागेविरुद्ध किंवा त्याच्या कोणत्याही भागाविरुद्ध विक्री, देवाणघेवाण, भेटवस्तू, गहाणखत, शुल्क, धारणाधिकार, भाडेपट्टा, वहिवाट, कुटुंब व्यवस्था, मृत्युपत्र, विश्वस्तव्यवस्था, देखभाल, वारसा, ताबा, परवाना, सुविधा, जप्ती, मनाई आदेश किंवा कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण किंवा मध्यस्थी, प्रिस्क्रिप्शन किंवा प्री-एम्प्शनचा अधिकार, कर्ज, आगाऊ रक्कम किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही दावा असलेल्या सर्व व्यक्तींना येथे विनंती केली जाते की त्यांनी हे प्रकाशन झाल्यापासून १५ दिवसांच्या आत, सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात ते खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला कळवावे, अन्यथा, अशा व्यक्तीचा दावा माफ करण्यात आला आहे आणि/किंवा सोडून देण्यात आला आहे असे मानले जाईल.

आज दिनांकित २२ डिसेंबर २०२५ रोजी
सही/-
**श्रीमती पूर्वी केनिल शाह**
**श्री. केनिल नरेंद्र शाह**
डी/७, चौथा मजला, त्रिवेणी सोसायटी, ६६ वाळकेश्वर रोड, मुंबई-४००००६.
मोबा.: ९७७३७९७७३९



**प्रोटोकॉल मरीन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**
परिसमापकासह पत्रव्यवहाराचा पत्ता - संपर्क: १०६, १ ला मजला, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३. +९१ ९८१९७९९४५५;
ईमेल: protocolmarine.cirp@gmail.com

**ई-लिलाव - आयबीसी, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री**
लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. २१ जानेवारी, २०२५ दु. १२.०० ते दु. १.००
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६च्या विनियमन ३२ व ३३ सह वाचावयाच्या आयबीसी, २०१६ च्या कलम ३५(एफ) अन्वये परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या **प्रोटोकॉल मरीन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)** च्या संपत्तीची विक्री. ई-लिलाव **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** आयोजित करण्यात येईल. ई-लिलाव विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव सेवा पुरवठादार यांच्या मार्फत बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म वेबसाईट https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home द्वारे करण्यात येईल.

रक्कम भारतीय रुपयांमध्ये

| अ. क्र. | तपशील | राखीव किंमत | ईएमडी | विस्तारयोग्य बोली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यालय क्र. १५०२/ए, १५ वा मजला, युनिव्हर्सल मॅजेस्टिक, पी. एल. लोखंडे रोड, आरव्हीके इंटरनॅशनल शाळेच्या मागे, सीटीएस क्र. ४ए/८/१, गाव बोर्ला, चेंबूर पश्चिम, मुंबई - ४०००४३ अदमासे आच्छादित क्षेत्रफळ ३५४ चौरस मीटर्स व त्यासह ४ स्टॅक कार पार्किंग जागा (एकूण ८ कार पार्किंग जागा) तसेच कार्यालयीन उपकरणे आणि फिक्स्चर व फर्निचर | भारतीय रुपये १०,००,००,००० | भारतीय रुपये १,००,००,००० | भारतीय रुपये १०,००,००० |

टीप:
१. ईएमडी सादरीकरण केल्यानंतर बोली लावता येतील. संभाव्य बोलीदारांनी इसारा रक्कम अनामत (ईएमडी) बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जमा करावी.
२. परिसमापकांनी कोणतेही कारण न दर्शविता आणि कोणत्याही दायित्वाशिवाय प्रक्रिया रद्द करण्याचे किंवा सुधारित करण्याचे हक्क राखून ठेवले आहेत. ही प्रक्रिया बंधनकारक नाही आणि परिसमापक/हिस्साधारक सल्लागार समितीच्या स्वेच्छानिर्णयाच्या अधीन असेल. अधिक तपशिलाकरिता प्रक्रिया ज्ञापन पहावे.
३. संभाव्य बोलीदारांनी हमी सादर करावी की, त्यांना संकेताच्या कलम २९ए अन्वये लागू मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेचा सामना करावा लागत नाही आणि जर ते कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.

**ईएमडी सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक** : सोमवार, दि. १९ जानेवारी, २०२६
**ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ** : बुधवार, दि. २१ जानेवारी, २०२६

टीप : ऑनलाईन लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती, ई-लिलाव बोली कागदपत्र, उद्घोषणा आणि इतर तपशील https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi/home वर उपलब्ध आहेत.
कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, कृपया निम्नस्वाक्षरीकारांना protocolmarine.cirp@gmail.com येथे संपर्क साधावा.

**दिनांक: २२ डिसेंबर, २०२५**
**ठिकाण: मुंबई**

सही/-
**हरिश कांत कौशिक**
**एनसीएलटीच्या दिनांक ४ डिसेंबर, २०२३ रोजीच्या आदेशानुसार प्रोटोकॉल मरिन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक**
**पत्रव्यवहाराचा पत्ता: १०६, १ ला मजला, कनाकिया ॲट्रियम २, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३**
**ईमेल: protocolmarine.cirp@gmail.com**
**नोंदणीकरण क्रमांक: IBBI/IPA-001/IP-P01469/2018-2019/12340**
**अभिहस्तांकनाकरिता प्राधिकरण दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत वैध**



**दिव्या ॲग्रो केम प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनाअंतर्गत)**
**सीआयएन: U24219MH2009PTC192776 च्या**
**ई-लिलावाद्वारे एकत्रितरित्या संपत्तीच्या विक्रीची सूचना**
**नोंद. कार्या.**: ९ क्वीन्स लॉन प्रिमायसेस सीएचएस लि. प्लॉट क्र. ९६७, सोनी मोनीसमोर, एस. व्ही. रोड, विलेपार्ले (प), मुंबई - ४०००५६.
**(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या तरतुदींअंतर्गत विक्री)**

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या तरतुदी आणि त्याअंतर्गत विनियमनांअन्वये सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माननीय एनसीएलटी, मुंबई यांच्या आदेश दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ सह वाचावयाच्या आदेश दिनांकित १९ डिसेंबर, २०२३ (आदेश दि. २ जानेवारी, २०२४ रोजी प्राप्त) नुसार नियुक्त करण्यात आलेल्या परिसमापकाद्वारे बनविलेल्या परिसमापन संपत्तीचा भाग असणाऱ्या दिव्या ॲग्रो केम प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनाअंतर्गत) (कॉर्पोरेट ऋणको/सीडी) च्या संपत्तीची एकत्रितरित्या विक्रीची प्रक्रिया दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी घेण्यात येणार आहे.

ई-लिलाव **"जसे आहे जेथे आहे तत्त्वावर", "जसे आहे जे आहे तत्त्वावर", "तेथे जे आहे तत्त्वावर" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर"** करण्यात येईल.

लिलाव निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव सेवा प्रदाता, पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मार्फत https://baanknet.com द्वारे आयोजित करण्यात येईल. सर्व संपत्ती प्लॉट क्र. ए-१४, महाड इंडस्ट्रियल एरिया, गाव-कांबळे, रायगड-४०२३०९ येथे स्थित आहेत. लिलाव मालमत्ता शोधण्याकरिता संपत्ती आयडी क्र. ६४६ आणि ६६८.

| | |
|---|---|
| ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | बुधवार, २१ जानेवारी, २०२६, स. ११.०० ते दु. २.०० पर्यंत |
| सहाय्यक दस्तऐवजांसह स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय) ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांक | शनिवार, १७ जानेवारी, २०२६ |
| प्रत्यक्ष पाहणीचा दिनांक आणि वेळ (लिलाव करावयाची संपत्ती महाड, महाराष्ट्र येथे स्थित आहे) | सोमवार, २२ डिसेंबर, २०२५ ते शनिवार, दि. १७ जानेवारी, २०२६ (दु. १२.०० ते ४.००). |
| इसारा रक्कम अनामत सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक | शनिवार, दि. १७ जानेवारी, २०२६ |


| अ क्र | तपशील (संपत्ती) | राखीव किंमत | ईएमडी (राखीव किमतीच्या अंदाजे १०%) | विस्तारयोग्य बोली रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम भारतीय रु.मध्ये |
| ब्लॉक अ | फॅक्टरी जमीन आणि इमारतीची फर्निचर आणि फिक्स्चरसह विक्री | ७८,२१,९०० | ७,८३,००० | १,००,००० |

**ई-लिलावाच्या महत्त्वाच्या अटी आणि शर्ती**: १. यशस्वी बोलीदार लिलाव प्रक्रियेदरम्यान अपात्र आढळल्यास त्याची इसारा रक्कम अनामत (ईएमडी) जप्त करण्यात येईल.
२. निर्दिष्ट वेळमर्यादेनुसार संबंधित लॉटकरिता विहीत ईएमडी पाठविलेली असल्यासच बोली करण्यास परवानगी देण्यात येईल.
३. परिसमापकाद्वारे विक्री प्रमाणपत्र पारित करण्याच्या दिनांकास, विद्यमान कार्यरत संपत्ती आणि दायित्वे ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजांच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून कॉर्पोरेट ऋणकोच्या विक्रीचा एक भाग म्हणून हस्तांतरित करण्यात येतील/हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल.
४. नोंदणीकरण शुल्क आणि इतर लागू कर/प्रभार, जर असल्यास, विक्री पूर्ण करण्याकरिता यशस्वी बोलीदारास अतिरिक्त भरावे लागतील.
५. अकराव्या ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजाद्वारे बोलीची प्रक्रिया समजून घेण्याकरिता तपशीलवार अटी आणि शर्ती पहाव्या.

**महत्त्वाच्या टिपा**: अ. लिलावात भाग घेण्यापूर्वी सर्व संपत्तीचे तपशील व त्यासह कोणत्याही प्रलंबित कायदेशीर प्रकरणे/चालू खटले जर असल्यास, पाहणे अनिवार्य आहे. संभाव्य बोलीदारांना सल्ला आहे की, त्यांनी कॉर्पोरेट ऋणकोसंबंधी त्यांची स्वतंत्र चौकशी करावी. इच्छुक अर्जदारांनी ई-लिलाव सेवा प्रदाता यांची वेबसाईट **https://baanknet.com** येथे किंवा ई-लिलावाच्या अटी आणि शर्तींचे तपशील समाविष्ट असणारे संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज पहावे किंवा **cirp.dacpl@gmail.com** येथे थेट ईमेल लिहून ते प्राप्त करावे.
ब. हे स्पष्ट करण्यात येते की, सदर आमंत्रणाद्वारे संभाव्य बोलीदारांना आमंत्रित करणे अभिप्रेत आहे आणि ते परिसमापक किंवा कंपनीच्या बाजूने विक्री परिणामकारक करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे बंधनकारक दायित्व निर्माण करीत नाही. परिसमापकास कोणताही किंवा सर्व प्रस्ताव/बोली स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा ई-लिलाव स्थगित करण्याचे/पुढे ढकलण्याचे/रद्द करण्याचे किंवा कोणतीही मालमत्ता किंवा तिचा भाग लिलाव प्रक्रियेमधून कोणत्याही टप्प्यावर मागे घेण्याचे किंवा कोणत्याही इच्छुक पक्षकार/संभाव्य गुंतवणुकदार/कोणत्याही दायित्वाशिवाय बोलीदारास अपात्र करण्याचे संपूर्ण हक्क आहेत. विक्री सूचनेमध्ये कोणतीही सुधारणा **https://ibbi.baanknet.com/eauctionibbi/auc-listing** या वेबसाईटवर अपलोड करण्यात येतील.
क. सर्व बोलीदारांना वेबसाईटला नियमित भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे.

सही/-
**कु. पलक स्वप्निल देसाई**
**दिव्या ॲग्रो केम प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) चे परिसमापक**
**आयबीबीआय नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P01517/2019-2020/12515**
एएफए क्र.: AA1/12515/02/311225/107595 (दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत वैध)
पत्ता: ९०१, ९ वा मजला, पार्क विस्टाज, लल्लू भाई पार्कसमोर, एमटीएनएलजवळ, अंधेरी (प), मुंबई ४०००५८.
ठिकाण: मुंबई, दिनांक: २२.१२.२०२५

# नवाकाळ शब्दकोडे-१४६८



**आडवे शब्द –**

५. लहानपण, शैशव ७. षडरिपुंच्या आहारी गेलेला ११. 'एकच प्याला' नाटकाचे लेखक १२. मजाच मजा १३. ज्ञाती १४. चहाडी १७. मनातली इच्छा पूर्ण होण्यासाठी देवाला कबूल केलेले १९. रात्र २१. त्या ठिकाणी २३. तांबडा २५. समाधान, विझवणे २७. मासेमारीचा हूक, भीड घालणे २८. अतिशय वेगात ३०. वर्तुळ, तेजोप्रभा ३२. नमुना ३४. तिमिर ३५. अभिमानी ३७. सुका चारा ३९. नावापुरता ४१. घाई, धांदल ४३. समान, सारखा ४४. स्थान, झोपेत नसलेला ४६. वाईट सवय ४८. बंदुकीचा आवाज ४९. पापुद्रे सुटण्यासाठी लावलेली तेल-कणिक ५१. छत असलेला बैलगाडीचा प्रकार ५३. श्रीकृष्णाचा मोठा भाऊ ५५. सामूहिक आक्रंदन, शोक, विलाप ५८. भराभरा, वेगाने ५९. जंगल, बन, राई ६०. पक्ष्यांचा राजा ६२. हाताने गालावर केलेला प्रहार ६५. अधोगती ६६. कमनीय, बांधेसूद ६८. दोस्त ६९. गणिताची एक शाखा ७०. पोलिस खात्यातील एक कनिष्ठ पद ७१. हळवा, व्याकूळ, कंप पावणारा ७२. नाशिक-मुंबई जोडणारा घाट ७६. काव्य ७७. मचूळ, बेचव ७९. चंचूप्रवेश ८०. खाज ८१. 'डोंगरची मैना' म्हणून, ओळखले जाणारे बोराच्या जातीचे फळ ८२. पूर्वज ८४. औषधी मात्रा उगाळण्याचा दगड ८५. शर्वरी, रजनी ८६. दया, करूणा ८९. राखणदार, पहारेकरी ९२. खतरा, संकट ९३. जहाल विष ९५. रामजन्माची तिथी ९६. प्रभाव, ठसा, पगडा ९८. लोक ९९. चांदणी १००. गढी वा किल्ल्यावर गुप्त मसलतीची खोली १०१. उनाडपणा, निंदा, चटोरपणा १०२. जन्मजात

**उभे शब्द –**

१. झपाझप, पटपट २. बलाक पक्षी ३. पिणे ४. चमकदार, प्रकाशमान रंग ५. लहान ६. खाट ७. हवाई प्रवासाचे वाहन ८. दिवंगत ९. उणे १०. शंभर १५. पेरणी, लावणी १६. तळे १८. सारख्या वजनाचे, एकसारखे प्रमाण असलेले २०. अस्वस्थता, उलघाल २२. मोठे, महान २४. वनिता, महिला, स्त्री २६. धमनी, शीर २८. वारेमाप, अतिशय जास्त २९. घरातला कनिष्ठ, वयाने लहान ३१. जुळा, जावळा ३३. फायदा, प्राप्ती ३४. ढालीच्या जोडीचे शस्त्र ३५. उपवन, वाटिका ३६. सेवक, नोकर ३८. कंडी, अफवा, वदंता ४०. मोठा, मानकरी ४२. हंगाम, सुगीचा काळ ४५. ग्राम, नगर ४७. इंद्राचा हत्ती ५०. चेहऱ्यावर आलेली सूज ५२. शेकडा प्रमाण ५४. चिंतन ५६. थाटमाट ५७. पाऊल, शंका ५८. कच ६१. सुंदर, देखणा ६२. भीतीने सुटलेले कापरे ६३. राजाचा लेखनिक ६४. डोंगर फोडून काढलेला आरपार रस्ता ६५. स्वीकार ६७. सद्वर्तन, चांगले वागणे ७०. याग ७२. धीर, बळ, उत्साह ७३. वास्तवात आलेले ७४. मान दर्शवणारी पुरूषांच्या नावापुढे लावली जाणारी उपाधी ७५. एकूण ७७. इमारतीतील स्वतंत्र घर, गाळा ७८. बुडी मारणे ७९. संग्रहित, बाजूला ठेवलेले, बाकी ८१. त्रास, पीडा ८३. औषध ८४. नेहमी ८७. जंगलचा राजा- सिंह ८८. समाविष्ट ९०. ओशाळलेला ९१. झुंज ९२. चाकोरीबद्ध, सरळ (मार्ग) ९४. बुजरा स्वभाव असलेली, संकोची ९७. क्रीडा ९९. ज्वर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४६७ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. हव्यास ३. बोजवारा ६. मासला ८. मान्य ९. कैलास १०. भाट ११. मायाळू १२. मखलाशी १३. ऊन १५. मोहन १६. जास्त १८. मालकंस २०. उगवती २१. कजाग २३. मऊशार २५. पदवीदान २६. चूर २७. वरकरणी २९. माज ३१. सरबराई ३२. वसा ३४. गमजा ३६. महा ३७. शोकगीत ३८. कच ४०. संत तुकाराम ४३. क्रोध ४४. जावळ ४५. विद्वान ४७. दाट ४८. समाधी ५०. पराभूत ५२. सड ५३. दानव ५५. सर ५६. गाळ ५७. मास ५८. डाराडूर ६१. अवसर ६३. मौज ६४. भोजन ६६. वंदनीय ६७. गहन ७०. भाग्योदय ७१. साथ ७२. दंडक ७३. सूर ७४. रावी ७५. नान ७७. रंग ७८. नावडता ८०. राजी ८१. चवदार ८३. खडाजंगी ८५. सुकर ८६. खुळा ८७. तीन ८८. रुंजी ८९. गीतकार ९१. पांग ९३. ऋषी ९५. तसे ९७. लता ९९. भगीरथ १००. नेहमी १०१. नाद १०२. अनासक्त

**उभे शब्द** : १. हलाहल २. व्यास ३. बोट ४. वाढ ५. भयानक ७. समस्त ८. माशी १०. भान ११. माह १३. ऊसदर १४. गगन १५. मोतीचूर १६. जागर १७. कॅरम १८. मागोमाग १९. कंप २०. उदार २२. जावईशोध २३. मर २४. उणीव २६अ. रबडी २८. कलगीतुरा ३०. जम ३१. सहारा ३३. साकव ३५. मतदान ३६. मका ३९. चळवळ ४१. तुटवडा ४२. मस ४३. क्रोधी ४४. जात ४५. विसरभोळा ४६. द्राड ४९. मान ५०. परस ५१. भूक ५३. दास ५४. कडू ५५. सवय ५६. गाज ५७. मानभावी ५९. राष्ट्र ६०. रवंथ ६१. अनीन ६२. रगड ६३. मौन ६५. सौंदर्यवती ६८. हकनाक ६९. भरताड ७१. सान ७२. दंग ७३. सूड ७४. राजीखुषीने ७५. नार ७६. खडा ७७. रंगीत ७९. वरपांगी ८२. दानत ८३. खजील ८४. जंगी ८५. सुर ९०. कामना ९२. गरज ९४. रमी ९६. सेना ९८. तारू ९९. भक्त

## प्रसिद्ध महाकाल मंदिर विस्तारीकरण याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

■ उज्जैन

**उज्जैन** येथील प्रसिद्ध महाकाल मंदिर परिसराच्या विस्तारीकरणाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. महाकाल लोक टप्पा -२ प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या जमीन संपादनाला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने याचिकाकर्त्यांना चांगलेच फटकारले असून, संपादनाच्या प्रक्रियेवर शिक्कामोर्तब केले आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळताना स्पष्ट केले की, याचिकाकर्ता हा केवळ एक उपासक आहे, तो त्या जमिनीचा मालक नाही. त्यामुळे त्याला भूसंपादन प्रक्रियेला आव्हान देण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. उज्जैनमधील महाकाल लोक विस्तारासाठी राज्य सरकारने जमिनीचे संपादन केले होते. या प्रक्रियेला तकिया मशीद कमिटीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. मात्र, न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली. न्यायालयाने स्पष्ट केले की, याचिकाकर्ता हा केवळ एक उपासक आहे, तो त्या जमिनीचा मालक नाही. त्यामुळे त्याला भूसंपादन प्रक्रियेला आव्हान देण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही.

## केडगावात भीषण अपघात युवक ठार! मित्र गंभीर

■ दौंड

**दौंडमधील** केडगाव-चौफुला रस्त्यावर झालेल्या अपघातात केडगाव येथील एका युवकाचा जागीच मृत्यू झाला असून, दुसरा युवक जखमी झाला. बोरमलनाथ ओढ्याजवळ कार पलटी होऊन ओढ्यात कोसळल्याने हा अपघात झाला.

अपघातात कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. या अपघातात सार्थक बारवकर (रा. केडगाव) याचा जागीच मृत्यू झाला आहे, तर सार्थक कडू हा युवक जखमी झाला असून, त्याच्यावर चौफुला येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत आणि जखमी युवक हे दोघेही ११वीत एकत्र शिक्षण घेत होत आणि जिवलग मित्र होते. केडगावहून चौफुलाकडे जात असताना त्यांच्या कारला अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच केडगाव परिसरातील नागरिकांनी चौफुला येथील रुग्णालय परिसरात गर्दी केली.

## राज्यातील १३२ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांची 'एफआरपी' रक्कम थकवली

■ पुणे

**राज्याचा** गळीत हंगाम सुरू होऊन दीड महिन्याहून अधिक कालावधी झाला असला तरी अद्यापही १३२ कारखान्यांनी शेतकऱ्यांची एफआरपीची पूर्ण रक्कम थकविली आहे. १५ डिसेंबरअखेर १८४ साखर कारखाने सुरू होते. त्यापैकी केवळ ५२ कारखान्यांनी एफआरपीची पूर्ण रक्कम अदा केली आहे. उर्वरित कारखान्यांपैकी मोठ्या संख्येने कारखाने अंशतःच एफआरपी देत असल्याचे चित्र आहे.

राज्यात ८० ते ९९ टक्के एफआरपी देणारे २२ कारखाने आहेत. ६० ते ८० टक्क्यांपर्यंत एफआरपी देणारे ८, तर ६० टक्क्यांपेक्षा कमी एफआरपी देणारे तब्बल १०२ कारखाने आहेत. कायद्याने दहा दिवसांत पूर्ण एफआरपी देणे बंधनकारक असताना १३२ कारखान्यांनी या कायद्याला केराची टोपली दाखविल्याचे स्पष्ट झाले आहे. अतिवृष्टीने ऊस उत्पादकांच्या उत्पादनात घट होत असताना कारखान्यांची रक्कम थकित ठेवण्याच्या भूमिकेमुळे ऊस उत्पादकांतून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. थकबाकीदार कारखान्यांवर कारखानानिहाय कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. १५ डिसेंबर अखेर तब्बल २,७१९ कोटींची एफआरपी थकबाकी असल्याचे स्पष्ट झाले. तर आतापर्यंत २४८.०८ लाख टन उसाचे गाळप झाले आहे.



## माजी सरन्यायाधीश भूषण गवई नालसार विद्यापीठात प्राध्यापक

■ हैदराबाद

**माजी** सरन्यायाधीश भूषण गवई यांनी सेवानिवृत्तीनंतर नवी जबाबदारी स्वीकारली आहे. त्यांची हैदराबाद येथील नालसार विधी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअर प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाली आहे. यासंदर्भातील नियुक्तीपत्र विद्यापीठाचे कुलगुरू कृष्णदेव राव यांनी गवई यांना त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी दिले.

यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, भूषण गवई संविधानिक कायदा, न्यायप्रवेश आणि सामाजिक समावेशन या क्षेत्रातील संशोधन, अध्यापन व शैक्षणिक उपक्रमांचे नेतृत्व करणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे ५२वे सरन्यायाधीश न्या. गवई २३ नोव्हेंबर रोजी पदनिवृत्त झाले. निवृत्ती स्वीकारताना त्यांनी स्पष्ट केले होते की, ते कोणतेही शासकीय किंवा राजकीय पद स्वीकारणार नाहीत. केवळ कायदेविषयक सल्ला, मध्यस्थी, लवाद क्षेत्रात मर्यादित स्वरूपात सक्रिय राहतील.

## आसाममध्ये बांगलादेशींना वसवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न! मोदींचा नवा आरोप

पान १ वरून

बांगलादेशी घुसखोरांना पसंती देतात. आसाममध्ये सध्या दिसणारी विकासाची गती ही केवळ एका मोठ्या परिवर्तनाची सुरुवात आहे आणि विकसित भारताच्या प्रवासात आसामची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल.

दरम्यान, फाळणीच्या काळात काँग्रेसने आसाम पाकिस्तानला देण्याचा कट रचल्याचा आरोप काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला होता. त्यावर काँग्रेसने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेसचे खासदार मणिक्कम टागोर यांनी आज एक्सवर पोस्ट करत हे आरोप पूर्णपणे खोटे आणि राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे म्हटले आहे. ते म्हणाले की, आसाम पाकिस्तानला देण्याचा कोणताही प्रस्ताव नव्हता. आसाम हा हिंदूबहुल प्रांत होता आणि फाळणीच्या योजनेनुसार तो कधीही पाकिस्तानला देण्याचे ठरवण्यात आले नव्हते. केवळ आसाममधील सिल्हेट जिल्हा मुस्लिमबहुल होता, तो वादाचा विषय होता.

## अंबरनाथमध्ये शिंदेंचे वर्चस्व

पान १ वरून

प्रचाराची धुरा सांभाळली. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तब्बल तीन सभा घेत मतदारांना साद घातली. श्रीकांत शिंदे यांनी दुचाकीवरून प्रचार करत ताकद दाखवली.

निवडणूक काळात अंबरनाथमध्ये पैसे वाटप, बाहेरून बोगस मतदार व कार्यकर्ते आणल्याचे गंभीर आरोप झाले. अजित पवार गटाने उमेदवार मनीषा वाळेकर यांनी भाजपावर पैसे वाटल्याचा आरोप केला होता. मनीषा वाळेकर यांचा निवडणुकीत पराभव झाला. या ठिकाणी भाजपाच्या तेजश्री करंजुळे विजयी झाल्या. तर भाजपा आणि काँग्रेसने शिंदे गटावर बाहेरून बोगस मतदार आणल्याचा आरोप केला होता. भाजपा उमेदवार पवन वाळेकर यांच्या कार्यालयावर गोळीबार झाला होता. त्यांच्या मातोश्री मीना वाळेकर यांचा विजय झाला.

## नगरपालिका निवडणुकीत भाजपा, शिंदे, अजित पवारच जोरात

पान १ वरून- भक्कम कसा करणार हा मोठाच प्रश्न आहे.

आज निकाल लागल्यावर उद्धव आणि राज ठाकरे यांनी लगेच प्रतिक्रियाही दिली नाही. उबाठातर्फे संजय राऊत यांनी पत्रकार परिषद घेतली आणि तेच मशीन, तेच पैसे, तेच निकाल लोकांना पैसे घेऊन मते द्यायची सवय झाली आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. पण ठाकरे बंधूंकडे पाहून पैशाच्या पलीकडे जात मराठी माणूस क्रांती का करीत नाही, याचे उत्तर ते देऊ शकले नाहीत.

मनसे व शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या युतीची घोषणा येत्या एक-दोन दिवसांत होईल. अजून ७२ तास शिल्लक असून, काँग्रेसला सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत असे स्पष्ट करत खा. संजय राऊत यांनी टीकेचा तोच सूर निवडणूक निकालानंतर आळवला.

ते म्हणाले की, मनसेसोबत जागावाटपाची चर्चा संपली आहे. जर काही किरकोळ अडचणी निर्माण झाल्या तर त्यावर राज व उद्धव ठाकरे हे आपापल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या शंका दूर करतील. काँग्रेस सोबत असावा ही आमची इच्छा आहे. भाजपाला रोखण्यासाठी आपण साऱ्यांनी एकत्र येणे कसे गरजेचे आहे यावर त्यांच्या दिल्ली व राज्यातल्या पदाधिकारी यांच्याशी चर्चा सुरू आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, शिवसेना आता ठाण्यापुरती मर्यादित राहिली नाही तर शिवसेना घराघरामध्ये चांद्यापासून बांद्यापर्यंत पोहोचली आहे हे या निकालावरून स्पष्ट झाले. यावेळी त्यांनी विरोधकांचा पैसे वाटपाचा आरोप फेटाळत लोकांनी विकासाला मत दिल्याचा दावा केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विजयानंतर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, या निवडणुकीत ७५ टक्के जागा महायुती जिंकेल आणि त्यात भाजपा हा एक नंबरचा पक्ष असेल, असे भाकित मी आधीच केले होते. पण या निवडणुकीने नगरसेवकांचे सगळे रेकॉर्ड मोडले आहेत. २०१७ मध्ये आमचे १,६०८ नगरसेवक होते. ती संख्या आता दुपटीहून अधिक म्हणजे ३,३२५ झाली आहे. एकूण नगरसेवकांच्या ४८ टक्के भाजपाचे आहेत. इतिहासात कुणाला मिळाला नसेल, असा अभूतपूर्व विजय आम्हाला मिळाला आहे. विशेष म्हणजे, एकाही व्यक्तीवर, पक्षावर, नेत्यावर तसूभरही टीका न करता आम्हाला हा विजय मिळाला आहे.

| पक्ष | ठिकाण | उमेदवार | नाते |
|---|---|---|---|
| अपक्ष | संगमनेर | मैथिली तांबे (विजयी) | आ. सत्यजित तांबे यांची पत्नी |
| भाजपा | दोंडाई | नयन कुंवररावल (विजयी) | मंत्री जयकुमार रावल यांची आई |
| भाजपा | यवतमाळ | प्रियदर्शनी उईके (विजयी) | मंत्री अशोक उईके यांची मुलगी |
| शिंदे गट | मुक्ताईनगर | संजना पाटील (विजयी) | आ. चंद्रकांत पाटील यांची मुलगी |
| शिंदे गट | हिंगोली | रेखा बांगर (विजयी) | संजय बांगर यांची भावजय |
| शिंदे गट | फलटण | अनिकेतराजे निंबाळकर (पराभूत) | रामराजे निंबाळकर यांचा पुत्र |
| भाजपा | देवळी | शोभा तडस (पराभूत) | माजी खा. रामदास तडस यांची पत्नी |
| उबाठा | अंजनगाव सुर्जी | यश लवटे (पराभूत) | आ.गजानन लवटे यांचा पुत्र |
| शिंदे गट | भंडारा | अश्विनी भोंडेकर (पराभूत) | आ. नरेंद्र भोंडेकर यांची पत्नी |
| शिंदे गट | करमाळा | महानंदा जगताप (पराभूत) | आ. जयवंत जगताप यांची पत्नी |
| भाजपा | दर्यापूर | नलिनी भारसाकळे (पराभूत) | आ. प्रकाश भारसाकळे यांची पत्नी |
| शिंदे गट | बुलडाणा | पूजा गायकवाड (विजयी) | आ. संजय गायकवाड यांची पत्नी |
| भाजपा | चाळीसगाव | प्रतिभा चव्हाण (विजयी) | आ. मंगेश चव्हाण यांची पत्नी |
| अजित पवार (रा.) | पुसद | मोहिनी नाईक (विजयी) | आ. इंद्रनील नाईक यांची पत्नी |
| भाजपा | भुसावळ | रजनी सावकारे (पराभूत) | मंत्री संजय सावकारे यांची पत्नी |
| शिंदे गट | नंदुरबार | रत्ना रघुवंशी (विजयी) | आ. चंद्रकांत रघुवंशी यांची पत्नी |
| शिंदे गट | पाचोरा | सुनीता पाटील (विजयी) | आ. किशोर पाटील यांची पत्नी |
| शिंदे गट | वैजापूर | संजय बोरनारे (पराभूत) | आ. रमेश बोरनारे यांचे बंधू |
| शिंदे गट | सिल्लोड | समीर सत्तार (विजयी) | आ. अब्दुल सत्तार यांचा पुत्र |
| काँग्रेस | पाथरी | जुनेद दुर्राणी (पराभूत) | माजी. आ.बाबाजानी दुर्राणी यांचा पुत्र |
| भाजपा | धामणगाव रेल्वे | अर्चना रोडे (विजयी) | आ. प्रताप अडसर यांची बहिण |
| भाजपा | भद्रावती | अनिल धानोरकर (पराभूत) | खा. प्रतिभा धानोरकर यांचे दीर |
| उबाठा | रत्नागिरी | शिवानी माने (पराभूत) | माजी आ. बाळा माने यांची सून |
| शिंदे गट | भगूर | अनिता करंजकर (पराभूत) | उपनेते विजय करंजकर यांची पत्नी |
| भाजपा | सिन्नर | हेमंत वाजे (पराभूत) | खा. राजाभाऊ वाजे यांचे काका |
| अजित पवार (रा.) | गंगाखेड | ऊर्मिला केंद्रे (विजयी) | आ. धनंजय मुंडे यांची बहीण |
| शिंदे गट | हदगाव | रोहिणी वानखेडे (विजयी) | माजी खा. सुभाष वानखेडे यांची सून |
| अपक्ष | अंबाजोगाई | नंदकिशोर मुंदडा (विजयी) | आ. नमिता मुंदडा यांची सासरे |
| भाजपा | सासवड | आनंदी जगताप (विजयी) | आ. संजय जगताप यांची आई |
| भाजपा | गेवराई | गीता पवार (विजयी) | आ. लक्ष्मण पवार यांची भावजय |

## मनसेची डोंबिवलीतील माजी नगरसेविका भाजपात

■ डोंबिवली

**महापालिका** निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर डोंबिवलीतील मनसेच्या माजी नगरसेविका मंदा पाटील यांनी मनसेला रामराम ठोकत भाजपात केला आहे. हा पक्षप्रवेश भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत पार पडला.

दोन दिवसांपूर्वीच मंदा पाटील यांनी मनसेतील पदनियुक्त्यांबाबत नाराजी व्यक्त करत वरिष्ठ नेत्यांवर थेट टीका केली होती. पक्षात कार्यकर्ते आणि माजी पदाधिकाऱ्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला होता. या नाराजीनंतर आज थेट भाजपात प्रवेश केल्याने मनसेतील अंतर्गत असंतोष पुन्हा एकदा उघड झाला आहे. याआधीही कल्याण-डोंबिवली परिसरात मनसेचे अनेक पदाधिकारी आणि माजी लोकप्रतिनिधींनी पक्ष सोडल्याने मनसेची अडचण वाढत आहे.

## बोगस मतदान, पैसा व सत्तेचा गैरवापर हर्षवर्धन सपकाळ यांची प्रतिक्रिया

■ मुंबई

**सत्ताधारी** पक्षाकडून साम, दाम, दंड, भेद या नितीचा मुक्तपणे वापर करण्यात आला. निवडणुकीत बोगस मतदार, दडपशाही, सत्तेचा गैरवापर आणि पैशाचा प्रचंड वापर पाहायला मिळाला. सत्ताधारी पक्षांच्या विजयात निवडणूक आयोगाची मदत सर्वात महत्त्वाची ठरली आहे, अशी प्रतिक्रिया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे दिली.

निवडणूक निकालावर माध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, आज आलेले निकाल जनतेचा



कौल वाटत नाही. लोकशाही व संविधानाची पायमल्ली करत खुलेआमपणे दडपशाही करण्यात आली. निवडणूक आयोग सत्ताधाऱ्यांच्या हातचे बाहुले बनले आहे. निवडणूक आयोगाचा गोंधळी कारभार व सत्ताधारी पक्षांचा पैसा फेक तमाशा देख, हा खेळ या निवडणुकीत पाहायला मिळाला. या सर्व पार्श्वभूमीमुळे काँग्रेस पक्षाला अपेक्षित यश मिळालेले नाही. काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नसले तरी काँग्रेस पक्ष लोकशाही व संविधान रक्षणासाठी संघर्ष करत राहील, आमची ही वैचारिक लढाई आहे, असे सपकाळ म्हणाले.






# नवाकाळ




## भाजपा उमेदवार फक्त एका मताने विजयी



**मुंबई** - रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण नगरपरिषदेत भाजपाचे उमेदवार संदीप भिसे हे अवघ्या एका मताने विजयी झाले. प्रभाग क्रमांक ७ अ मधून संदीप भिसे हे विजयी झाले. शेवटी विजय तो विजय असतो. एक मताने काय आणि शंभर मतांनी काय. मतदारांनी माझ्यावर विश्वास दाखवला, तो विश्वास मी सार्थ ठरवेन, असे संदीप भिसे यांनी विजयानंतर बोलताना सांगितले.

### दोंडाईचात जयकुमार रावल यांच्या आईची बिनविरोध निवड

**धुळे** - धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी भाजपा नेते व राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या आई नयनकुंवरताई रावल यांची बिनविरोध निवड झाली आहे. शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार शरयू भावसार यांचा उमेदवारी अर्ज रद्द झाल्याने ही निवड बिनविरोध झाली. भाजपाने हा विजय जल्लोषात साजरा केला असून, या निकालामुळे महाविकास आघाडीला मोठा धक्का बसल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. या निर्णयावर महाविकास आघाडीने आक्षेप घेत सत्तेचा गैरवापर करून अर्ज बाद करण्यात आल्याचा आरोप केला होता.

### भगूरमध्ये २५ वर्षांची शिवसेनेची सत्ता उलथवली

**नाशिक** - जिल्ह्यातील भगूर नगरपरिषदेत मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेनेची २५ वर्षांची सत्ता संपुष्टात आणली. या निवडणुकीत प्रेरणा बलकवडे यांनी बाजी मारत माजी नगराध्यक्ष विजय करंजकर यांना जोरदार धक्का दिला. त्यांनी शिंदे गटाच्या उमेदवार आणि विजय करंजकर यांच्या पत्नी अनिता करंजकर यांना पराभूत केले. बलकवडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपा आणि उबाठा युतीतर्फे निवडणूक लढवली होती. या निकालामुळे स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

### मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात भाजपाला घवघवीत यश

**नागपूर** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर जिल्ह्यात झालेल्या नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजपाने मोठे यश मिळवले आहे. जिल्ह्यातील एकूण १५ पालिकांपैकी १२ पालिकांमध्ये भाजपाचे नगराध्यक्ष निवडून आले आहेत.
सावनेर, उमरेड, खापा, वाडी, कळमेश्वर या नगरपालिकांमध्ये भाजपा विजयी ठरला आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामठी नगरपालिकेत भाजपाला प्रथमच यश मिळाले आहे. सावनेर पालिकेत पुन्हा एकदा काँग्रेस नेते सुनील केदार यांना धक्का देण्यात भाजपा यशस्वी झाली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने काटोल नगरपालिकेत नगराध्यक्षपद जिंकले आहे. रामटेकमध्ये शिंदे गटाच्या शिवसेनेने आपला गड राखला आहे.

### कागलमध्ये निकालाआधीच उमेदवाराच्या अभिनंदनाचे बॅनर

**कोल्हापूर** - कोल्हापूर जिल्ह्यातील कागल नगरपरिषद निवडणुकीच्या मतमोजणीला सुरुवात होण्याआधीच विजयाचे अभिनंदन करणारे बॅनर लागल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. कागल शहरातील विविध भागांत लावण्यात आलेल्या या बॅनरवर मंत्री हसन मुश्रीफ आणि समरजित घाटगे यांच्या संयुक्त आघाडीतील उमेदवारांच्या विजयाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला. मतमोजणी सकाळी १० वाजता सुरू होणार असताना, त्याआधीच विजयाचे फलक झळकल्याने अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेष म्हणजे, या निवडणुकीत पूर्वी कट्टर विरोधक असलेले मंत्री हसन मुश्रीफ आणि समरजित घाटगे यांनी एकत्र येत राजकीय आघाडी केली आहे. या अनपेक्षित युतीने निवडणूक प्रक्रियेत मोठी उत्सुकता निर्माण केली.

## गिरीश महाजन यांचा मोठा विजय
## पत्नीसह २७ नगरसेवक बिनविरोध

■ जळगाव

**जळगाव** जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमध्ये भाजपाने बिनविरोध निवडीत मोठी आघाडी घेतली आहे. २७ नगरसेवक बिनविरोध निवडून आले असून, त्यापैकी सर्वाधिक नगरसेवक भाजपाचे आहेत. जामनेर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी मंत्री गिरीश महाजन यांच्या पत्नी साधना महाजन यांची बिनविरोध निवड होऊन त्यावर अधिकृत शिक्कामोर्तब झाल्याने भाजपामध्ये जल्लोष केला.



जळगावमधील अमळनेर, एरंडोल, रावेर आणि शेंदुर्णी येथे प्रत्येकी एक, भुसावळमध्ये चार, सावदा आणि फैजपूरमध्ये प्रत्येकी पाच, तर जामनेरमध्ये तब्बल नऊ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. पक्षनिहाय आकडेवारीनुसार भाजपाचे १८ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. शिवसेना शिंदे गटाचे २ , काँग्रेसचा १ , राष्ट्रवादी शरद पवार गटाचा १ तर इतर/अपक्ष २ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत.

विशेषतः जामनेर आणि भुसावळमध्ये भाजपला मोठे यश मिळाले आहे. जामनेरमध्ये भाजपचे ९ नगरसेवक बिनविरोध ठरले असून, भुसावळमध्ये ४ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. फैजपूरमध्ये भाजपाचे ३ , काँग्रेसचा १ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचा १ अशा एकूण ५ जागा बिनविरोध झाल्या आहेत. सावदा येथे शिंदे गटाचे २ आणि भाजपाचा  १ नगरसेवक बिनविरोध निवडून आला आहे. रावेरमध्ये भाजपाचा १, एरंडोलमध्ये शिंदे गटाचा १ नगरसेवक बिनविरोध ठरला आहे.

## मुश्रीफ-घाटगे आघाडी करूनही झटका

■ कोल्हापूर

**अजित** पवार गटाचे हसन मुश्रीफ आणि सरमजित घाटगे यांनी युती करूनही ते शिंदे गटाला रोखू शकले नाहीत. कोल्हापूरच्या मुरगूडमध्ये नगरपरिषद निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने जोरदार विजय मिळवला. २० जागांपैकी शिवसेना १६ जागांवर विजयी ठरली, तर राष्ट्रवादी काँग्रेसला फक्त ४ जागांवर समाधान मानावे लागले. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेनेच्या सुहासिनी देवी, प्रवीणसिंह पाटील यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला. या निकालामुळे मुरगूडमधील मंत्री हसन मुश्रीफ आणि समरजित घाटगे यांना मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसला पेठवडगाव आणि शिरोळ या दोन ठिकाणी विजय मिळवता आला, तर जनसुराज्य पक्षाने मलकापूर व पन्हाळा नगरपरिषदेत आपले वर्चस्व दाखवले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला गडहिंग्लज आणि कागलमध्ये विजय मिळाला.

## काय डोंगर! काय झाडी!
## सांगोल्यात बापूच हीट

■ सांगोला



**काय** डोंगर, काय झाडी फेम शहाजी बापू हे पुन्हा हीट ठरले. सांगोला नगर परिषदेवर शहाजी बापू पाटील यांची एकहाती सत्ता आली आहे. निवडणुकीच्या आधी निवडणूक आयोगाचे भरारी पथक आणि पोलिसांनी शहाजी बापू यांच्या कार्यालयावर धाड टाकून झाडाझडती घेतली होती. शहाजी बापू रडवेले झाले होते. या धाडीमागे फडणवीस असल्याची चर्चा होती, पण भाजपा व उबाठा जोडी अपयशीच ठरली. त्यामुळे शहाजी बापूंची यांच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली होती. या धाडीचा कोणताही परिणाम निवडणूक निकालावर पडला नाही. नगराक्षपदाच्या उमेदवार आनंदा माने यांच्यासह १७ जागांवर शहाजी बापूंचे उमेदवार विजयी झाले. या विजयानंतर प्रतिक्रिया देताना शहाजी बापू म्हणाले की, मला माझ्या सांगोला शहरातील मतदारांविषयी गर्व आणि अभिमान वाटतो आहे. भाजपाने उबाठासारख्या पक्षाला बरोबर घेऊन केलेली युती आमच्या मतदारांना आवडलेली नाही. शेतकरी कामगार पक्ष, उबाठा व भाजपा असे सर्वच पक्ष आमच्या विरोधात होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाने मात्र मला पाठिंबा दिला होता. मतदारांनी अचानक झालेल्या वेगवेगळ्या पक्षाच्या युत्या अमान्य केल्या.

## सातार्‍यात दोन्ही राजेंना
## अपक्ष उमेदवारांचा झटका

■ सातारा

**सातारा** जिल्ह्यातील नगरपालिका निवडणुकांमध्ये खासदार आणि आमदार असलेल्या दोन्ही राजेंसह माजी आ. डॉ. येळगावकर या बड्या नेत्यांना अपक्ष उमेदवारांनी झटका दिला.

भाजपा खा. छत्रपती उदयनराजे भोसले आणि राज्याचे बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांच्या उमेदवारांना पराभूत व्हावे लागले. याठिकाणी नगराध्यक्षपदासाठी भाजपाने अमोल मोहिते तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाकडून सुवर्णा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र या लढतीत अपक्ष उमेदवार शंकर किर्दत यांनी विजयाचा गुलाल उधळला. या फलटणमध्ये शिंदे गटाकडून रामराजे नाईक-निंबाळकर यांचे पुत्र अनिकेतराजे नाईक-निंबाळकर आणि भाजपाकडून रणजितसिंह नाईक निंबाळकर यांचे बंधू समशेरसिंह नाईक-निंबाळकर यांच्यात लढत झाली. इथे समशेरसिंह यांच्यासह भाजपाच्या २० उमेदवारांनी विजयाचा गुलाल उधळला. याशिवाय सातारा नगरपालिकेतील प्रभाग क्रमांक तीनमध्ये भाजपाचे माजी आमदार डॉ. दिलीप येळगावकर यांच्या स्नुषा रेणू येळगावकर यांचा पराभव करत अपक्ष जयश्री जाधव यांनी विजय मिळवला. या प्रभागात भाजपचे दोन्ही उमेदवार पराभूत झाले आहेत. म्हसवडमध्ये भाजपाने २१ उमेदवारांच्या विजयासह एकहाती सत्ता मिळवली.

## तुळजापूर ड्रग प्रकरणातील
## भाजपाचा पिंटू गंगणे विजयी

■ तुळजापूर



**तुळजापूर** नगरपरिषदेवर भाजपाने वर्चस्व सिद्ध करत महाविकास आघाडीला धक्का दिला. नगराध्यक्ष निवडणुकीत भाजपाचे उमेदवार विनोद उर्फ पिंटू गंगणे याने महाविकास आघाडीचे उमेदवार काँग्रेसचे अमर मगर यांचा १७७० मतांनी पराभव केला. या निकालामुळे भाजपाचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांचा तुळजापूर मतदारसंघातील दबदबा पुन्हा दिसला आहे.

विनोद उर्फ पिंटू गंगणे यांचे नाव तुळजापूर ड्रग प्रकरणामुळे राज्यभर चर्चेत आले होते. गंगणे सध्या जामिनावर बाहेर आहेत. तरीही भाजपाने त्यांना उमेदवारी दिली होती. ऑगस्ट महिन्यात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या तुळजापूर दौऱ्यादरम्यान आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत गंगणे यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला होता. या सत्कारामुळे ड्रग प्रकरणातील आरोपींना राजकीय वरदहस्त दिला जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. हा मुद्दा राज्यभर चर्चेचा विषय ठरला होता.

## फडणवीसांचे निकटवर्ती
## औसात पूर्ण अपयशी

■ लातूर

**लातूर** जिल्ह्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या औसा नगरपरिषदेत सत्तापालट झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपा-शिंदे गटाच्या युतीला जोरदार धक्का दिला. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निकटवर्तीय मानले जाणारे आमदार अभिमन्यू पवार यांच्या मतदारसंघातच कमळ फुलले नाही. नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या उमेदवार परवीन शेख यांनी सुमारे ६००  मतांच्या फरकाने विजय मिळवला. या विजयानंतर औसा शहरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाके वाजवत आणि गुलाल उधळत जल्लोष साजरा केला.औसा नगरपरिषदेच्या एकूण २३ जागांसाठी मतदान झाले होते. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने १७ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत मिळवले. भाजपा - शिंदे गट युतीला केवळ ६ जागांवर समाधान मानावे लागले. या निवडणुकीत आजी-माजी आमदारांनी प्रचार केला असूनही अजित पवारांच्या झंझावातासमोर युतीला यश मिळवता आले नाही.

## धनंजय मुंडेंच्या भावनिक आवाहनाचा परिणाम

■ परभणी

### बहीण ऊर्मिला विजयी



**परभणी** जिल्ह्यातील गंगाखेड नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपाला धक्का देत बाजी मारली आहे. आमदार धनंजय मुंडे यांच्या बहीण ऊर्मिला केंद्रे या नगराध्यक्षपदी विजयी झाल्या असून, या विजयामुळे गंगाखेडमधील राजकीय समीकरणे बदलली आहेत.

निवडणूक प्रचारादरम्यान धनंजय मुंडे यांनी गंगाखेडमध्ये घेतलेली भावनिक सभा निर्णायक ठरल्याचे बोलले जात आहे. या सभेत त्यांनी केलेले आवाहन उर्मिला केंद्रे यांच्या विजयासाठी परिणामकारक ठरले. या निकालामुळे गंगाखेड विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व करणारे राष्ट्रीय समाज पक्षाचे आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांना राजकीय धक्का बसल्याचे मानले जात आहे.

दरम्यान, परभणी जिल्ह्यातील सात नगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाले असून, सेलू नगरपरिषदेत भाजपाचे मिलिंद सावंत यांचा विजय झाला आहे. जिंतूर नगरपरिषदेत भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार प्रताप देशमुख विजयी झाले आहेत. जिंतूर आणि सेलू या दोन्ही मतदारसंघांचे नेतृत्व पालकमंत्री मेघना बोर्डीकर करत असल्याने या विजयाकडे त्यांच्या नेतृत्वाचे यश म्हणून पाहिले जात आहे. मानवत नगरपरिषदेत अंजली महेश कोकड, पाथरी नगरपरिषदेत आसेफ खान (राष्ट्रवादी - अजित पवार गट), पूर्णा नगरपरिषदेत प्रेमला संतोष एकलारे (उबाठा) तर सोनपेठ नगरपरिषदेत अपक्ष उमेदवार परमेश्वर राजेभाऊ कदम यांनी विजय मिळवला आहे.

## हिंगोली जिल्हा! शिंदेंचा बालेकिल्ला
## संतोष बांगरांचे भाऊ, भावजय विजयी

■ हिंगोली



**हिंगोली** नगरपरिषदेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने मोठा विजय मिळवला आहे. शिवसेनेच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार आणि आमदार संतोष बांगर यांच्या भावजय रेखा श्रीराम बांगर या दणदणीत १२ हजार मतांनी विजयी झाल्या तर आमदार संतोष बांगर यांचे बंधू व त्यांचे पती श्रीराम बांगर हे नगरसेवक म्हणून विजयी झाले आहेत. या विजयानंतर आनंदी होऊन बांगर यांनी दोन्ही हात उंचावत ‘हिंगोली जिल्हा शिंदेंचा बालेकिल्ला’ अशी आरोळीच ठोकली.

आमदार संतोष बांगर यांच्या नेतृत्वाखाली शहरात विजयी रॅली काढण्यात आली. निवडणूक काळात हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील कन्याशाळा मतदान केंद्रावर बांगर यांनी मतदान कक्षात जाऊन एका महिला मतदाराला कोणते बटण दाबायचे याबाबत मार्गदर्शन केल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. निवडणूक प्रक्रियेच्या गोपनीयतेचा भंग केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.



## ताज, ओबेरॉयच्या स्पर्धेत आता
## अदानी समूहाची पंचतारांकित हॉटेल

■ मुंबई

**गौतम** अदानी यांचा समूह भारताच्या आतिथ्य (हॉस्पिटॅलिटी) क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रवेश करण्याची तयारी करत असून, त्यांच्या केंद्रस्थानी नवी मुंबई आहे. नवी मुंबईत अदानी समूह नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि त्याच्या आसपास मोठ्या प्रमाणावर बांधकाम करत आहे. केवळ नवी मुंबईतच सुमारे १५ हॉटेल उभारण्याची त्यांची तयारी आहे.

विमानतळ व रिअल इस्टेट व्यवसायाच्या आधारावर हा उपक्रम राबवला जात आहे. अदानी समूहाच्या हॉटेल उद्योगातील प्रवेशामुळे टाटा समूहाची ताज, आयटीसी हॉटेल आणि ओबेरॉय साखळी यांसारख्या प्रस्थापित हॉटेल समूहांशी थेट स्पर्धा होणार आहे. अदानी समूह भारतभर ६० पेक्षा अधिक हॉटेल सुरू करण्याची योजना आखत आहे. ही हॉटेल प्रामुख्याने समूह चालवत असलेल्या विमानतळांशी आणि त्यांच्या ताब्यातील मोठ्या रिअल इस्टेट प्रकल्पांशी जोडलेली असतील. बहुतेक हॉटेल्सचे विकासकाम स्वतः अदानी समूह करणार आहे. काही ठिकाणी स्वतःच्या ब्रँडखाली हॉटेल चालवण्याऐवजी  अदानी समूह हॉटेल ऑपरेटरांशी भागीदारी करण्याची योजना आखत आहे. या पद्धतीमुळे समूहाला मालमत्ता विकासावर लक्ष केंद्रित करता येईल, तर संचालन, वितरण व ग्राहक निष्ठा यासाठी जागतिक आतिथ्य ब्रँड्सचा अनुभव वापरता येईल, असे बोलले जात आहे.

## शाळेच्या नावात ‘सीबीएसई’चा वापर
## राज्य मंडळाचा कारवाईचा ईशारा


सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा


■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** सीबीएसई अभ्यासक्रमाशी संलग्न नसतानाही काही शाळा पालकांना आकर्षित करण्यासाठी शाळांच्या नावांमध्ये ‘सीबीएसई’, ‘इंटरनॅशनल’ किंवा ‘ग्लोबल’ अशा शब्दांचा वापर करतात. या शाळा पालकांची दिशाभूल करत असून, पालकांची यामुळे फसवणूक होत आहे. हे थांबविण्यासाठी शिक्षण संचालनालयाने शाळांच्या नावांमधून असे शब्द वगळण्याचे निर्देश दिले आहेत. याबाबतचे पत्रक संचालनालयाने नुकतेच जारी केले.

राज्य शिक्षण मंडळाशी संलग्न असलेल्या शाळाही आपल्या नावापुढे ‘इंटरनॅशनल’, ‘ग्लोबल’, ‘सीबीएसई’ किंवा ‘इंग्लिश मीडियम’ अशा शब्दांचा वापर करत असल्याने शाळा आंतरराष्ट्रीय किंवा केंद्रीय मंडळाशी संलग्न असल्याचे पालकांना वाटते. त्यामुळे पालकांची फसवणूक होऊ शकत असल्याचे शिक्षण संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. केवळ केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अधिकृत शाळांसाठी ‘सीबीएसई’ शब्द वापरता येतो. मात्र राज्य मंडळाच्या शाळांनी सीबीएसई शब्द नावात वापरणे अनुचित असल्याचेही संचालनालयाने स्पष्ट केले आहे. ‘इंटरनॅशनल’ किंवा ‘ग्लोबल’ असे शब्द वापरण्यासाठी संबंधित शाळेची परदेशातील शाखा किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील अधिकृत संलग्नता असणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले आहे.

## भांडूपमध्ये ८७ तास पाणी कपात

■ मुंबई

**मुंबई** महापालिकेच्या ‘एस’ विभागात काही भागांत २२ डिसेंबर ते २६ डिसेंबर मध्यरात्री १ वाजेपर्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. एमएमआरडीएच्या मेट्रो लाईन ७ अ प्रकल्पाच्या कामासाठी २,४०० मिलीमीटर व्यासाच्या अपर वैतरणा मुख्य जलवाहिनीचा काही भाग वळविण्यात आला आहे.

या वळविण्यात आलेल्या भागाचे काम पालिकेमार्फत करण्यात येणार आहे. हे काम आज सकाळी १० वाजल्यापासून  पुढील ८७ तास सुरू राहणार आहे. त्यामुळे ‘एस’ विभागात पाणीपुरवठा कमी दाबाने होणार आहे.

## फिल्मसिटी माजी व्यवस्थापक गोविंद स्वरूप २१ वर्षांनी निर्दोष

■ मुंबई

**पुराव्यांवरून** फसवणुकीचा हेतू सिद्ध होत नाही असे स्पष्ट करत विशेष न्यायालयाने महाराष्ट्र चित्रपट, रंगमंच आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे (फिल्मसिटी) माजी व्यवस्थापकीय संचालक गोविंद स्वरूप यांना २००४ च्या भ्रष्टाचार प्रकरणातून तब्बल २१ वर्षांनी निर्दोष मुक्त केले.

निधीचा अपहार किंवा गैरवापर झाल्याचे तपासनीसांच्या खटलादरम्यानच्या तपासणीत कुठेही आढळून आले नाही, असे निरीक्षण यावेळी कोर्टाने नोंदवले. भ्रष्टाचार विरोधी खटल्यासाठीच्या विशेष न्यायालयाचे न्या. एस.एस. नागूर यांनी या फिल्मसिटीचे तत्कालीन आर्थिक सल्लागार अशोक शुक्ला यांचीही निर्दोष मुक्तता केली. रेकॉर्डवरील पुरावे, फसवणूक करून संस्थेचे

### विशेष न्यायालयाचा निर्णय

नुकसान करण्याचा आरोपींचा कोणताही हेतू दर्शवत नाहीत, असे न्यायालयाने  नमूद केले. २००१ मध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त नियोजित ‘हम एक है’ नावाच्या मेगा-इव्हेंटच्या संदर्भात एसीबीने आर्थिक गैरव्यवस्थापन व १५ कोटी इतक्या निधीचा गैरवापर केल्याचा आरोप केला होता. गुजरातमध्ये भूकंप झाल्याने हा कार्यक्रम त्यावेळी रद्द करण्यात आला होता. आरोपींनी निर्मात्यासोबत मंजुरीशिवाय करार केले व खाजगी व्यक्तींसोबत अनधिकृत संयुक्त बँक खाती उघडली, असे एसीबीचे म्हणणे होते. त्याचप्रमाणे खाजगी कार्यक्रमासाठी कर्ज आणि बँक हमी मिळवण्यासाठी फिल्मसिटी कॉर्पोरेशनच्या मुदत ठेवी गहाण ठेवल्या गेल्या ज्यामुळे कंपनीला ६.४२ कोटी रुपयांचे नुकसान झाले, असा दावा सरकारी वकिलांनी त्यांच्या युक्तिवादात केला.

हे सर्व आरोप उपलब्ध पुराव्यांवरून सिद्ध होत नाहीत असे सांगून कोर्टाने स्वरूप व शुक्ला यांची निर्दोष मुक्तता केली.

## विकसित भारत-जी राम जी विधेयक मंजूर

### राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केली

■ नवी दिल्ली

**नुकत्याच** झालेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात ज्या विधेयकावरून गदारोळ झाला, त्या भारत-गारंटी फॉर रोजगार आणि आजीविका मिशन (ग्रामीण) अर्थात व्हीबी-जी राम जी विधेयकाचे आता कायद्यात रूपांतरित झाले आहे. या विधेयकाला  राष्ट्रपतींनी मंजुरी दिली आहे.

या नव्या कायद्यानुसार ग्रामीण भागातील पात्र कुटुंबांना मजुरीवर आधारित रोजगाराची वैधानिक हमी १०० वरून १२५ दिवसांपर्यंत वाढवण्यात आली आहे. आधी मनरेगा असे नाव असलेल्या या योजनेचे नाव बदलण्यावर विरोधकांनी आक्षेप घेतला होता. त्यानंतर संसदेत यावर जोरदार चर्चा झाली होती. सरकारच्या मते, या कायद्यामुळे ग्रामीण रोजगाराची कायदेशीर हमी अधिक मजबूत होणार असून मजूर, शेतकरी आणि भूमिहीन कुटुंबांना आर्थिक सुरक्षा मिळेल. यामुळे गावांमध्येच रोजगार उपलब्ध होऊन शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत होईल.

